मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in | E mail - dainikyuvakaadhar@gmail.com | facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

संपादक - संतोष शिवदास आमले




। मुख्य संपादक - भारती आमले । उपसंपादक - श्री विलास गायकवाड । कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे । निवासी संपादक - श्री राकेश पाटील । सह संपादक - श्री मुकुंद कांबळे । महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

■ वर्ष : ३ ■ अंक : ९६ ■ रविवार, १४ डिसेंबर २०२५ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# नागपूर येथे नविन ९ वीज उपकेंद्रांना मंजूरी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथील विविध विकास कामांचा आढावा

- खामला येथे लंडनस्ट्रीट आणि नविन बुटीबोरीसाठी साकारणार वीज उपकेंद्र
- जयताळा व हुडकेश्वर येथे प्रधानमंत्री आवास योजनेसाठी महानगरपालिकेला मिळणार भूखंड
- नविन नागपूर व रिंगरोडसाठी हुडकोकडून मिळणाऱ्या कर्जाला महाराष्ट्र शासन देणार हमी

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी/नागपूर** : महानगराच्या वाढत्या विस्तारात पायाभूत सुविधांचा विस्तार प्राधान्यक्रमाने झाला तरच नागरी सुविधांमध्ये कोणतेही अडथळे येत नाहीत. या पायाभूत सुविधांमध्ये वाढती विजेची गरज व त्याच्या अखंडीत पुरवठ्यासाठी वीज उपकेंद्राची त्या-त्या भागांमध्ये उभारणी आवश्यक आहे. नागपूरमधील खामला परिसरात साकारणारे लंडनस्ट्रीट सारखे प्रकल्प लक्षात घेऊन याठिकाणी 220 के.व्ही. वीज उपकेंद्राला लंडनस्ट्रीट येथे जागा देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महानगरपालिकेला दिले. याचबरोबर बुटीबोरी क्षेत्रात नविन औद्योगिक वसाहतीसह साकारलेल्या भागात वाढती विजेची गरज लक्षात घेऊन 400 के.व्ही. वीज उपकेंद्रासाठी एम.आय.डी.सी. जागा उपलब्ध करुन देईल असा महत्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांबाबत आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवन येथील कॅबिनेट सभागृहात बैठक संपन्न झाली. या बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार कृष्णा खोपडे, आमदार प्रविण दटके, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असिमकुमार गुप्ता, अपर मुख्य सचिव (वित्त विभाग) ओ.पी. गुप्ता, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, गृह विभागाचे प्रधान सचिव राधिका रस्तोगी, गृह विभागाचे प्रधान सचिव अनूपकुमार सिंग, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, मनपा आयुक्त अभिजित चौधरी, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मीना, पोलिस आयुक्त रविंद्रकुमार सिंगल, जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.




नागपूर महानगराच्या विजेची गरज लक्षात घेऊन यावर्षी जाटतरोडी व पाचगाव येथे दोन नविन केंद्र कार्यान्वित करण्यात आली आहेत. याचबरोबर खापरी आणि उमरेड येथील उपकेंद्राची क्षमता वाढ करण्यात आली आहे. लेंड्रापार्क, मिहान, येनवा व बुटीबोरी (आवाडा) येथे उपकेंद्राचे काम प्रगती पथावर असल्याची माहिती ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांनी दिली. कडवली, बाजारगाव येथील उपकेंद्राचे काम प्रगती पथावर आहे. कन्हान, सेलू येथील उपकेंद्राचे नियोजन केले आहे. या व्यतिरिक्त हिंगणा, महालगाव, एमआयडीसी उमरेड, दाभा, पावनगाव, काटोल आणि नेरी येथील 7 उपकेंद्रांना मान्यता देण्यात आली.

**नविन नागपूर आणि रिंगरोडसाठी हुडकोकडून 7 हजार 800 कोटी रुपये कर्जासाठी महाराष्ट्र शासन देणार हमी**

विविध औद्योगिक प्रकल्प व रोजगाराच्या संधीमुळे नागपूरचा विस्तार झपाट्याने होत आहे. सद्यस्थितीत नविन नागपूर आणि नविन रिंगरोड याचे जाळे निर्माण करुन त्या-त्या भागात असलेल्या मुख्य रस्त्यांना नवा रिंगरोड जोडला जाणार आहे. या विस्तार कामासाठी हुडकोकडून घेतल्या जाणाऱ्या कर्जाला शासनाची हमी देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. यात नविन नागपूरसाठी 3 हजार कोटी व रिंगरोडसाठी 4 हजार 800 कोटी रुपये आहेत. याबाबत नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मीना यांनी सादरीकरण केले.

**प्रधानमंत्री आवास योजनेसाठी जयताळा येथील भूखंड महानगरपालिकेला मिळणार**

कोणताही व्यक्ती घरापासून वंचित राहू नये यादृष्टीने प्रधानमंत्री आवास योजनेतून मोठ्या प्रमाणात घरे उपलब्ध करुन दिले जात आहेत. कमी आर्थिक उत्पन्न घटकासाठी सदनिकांचा प्रकल्प राबविण्यासाठी जयताळा येथील म्हाडाकडे असलेली सुमारे 11 हजार 913.19 चौ.मि. जागा नागपूर महानगरपालिकेला आता दिली जाणार आहे. याबाबत बैठकीत चर्चा करुन निर्णय घेण्यात आला. याचबरोबर हुडकेश्वर येथील सुमारे 4 हजार 625 चौ.मि. शासकीय जागा प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत प्रकल्पासाठी नाममात्र दराने हस्तांतरीत करण्यास या बैठकीत निर्णय घेण्यात आला. महानगरपालिकेत सेवा प्रवेश नियमांमध्ये सुधारणा करुन कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवा ज्येष्ठतेनुसार प्राधान्यक्रम देण्याबाबत या बैठकीत निर्णय घेण्यात आला. अधिसंख्य सफाई कामगार पदावर सामावून घेण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसाहक्क लाभ प्रदान करण्याबाबत घेतलेल्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा आढावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला.

या बैठकीत पोलिस विभागांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. पोलिस आयुक्तालय, पोलीस महासंचालनालय व शासक यात योग्य तो समन्वय साधून नविन पोलिस स्टेशनची निर्मिती, याला लागणारे मनुष्यबळ याबाबत सविस्तर प्रस्ताव करुन तो सादर करण्याचे निर्देश या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

## भाजपा नेते बबन बारगजे यांच्या वाढदिवसानिमित्त कळंबोली मध्ये खेळ पैठणीचा व अभिष्टचिंतन कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** भारतीय जनता पार्टी भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष श्री बबन बारगजे यांचा वाढदिवस सोमवार दिनांक 15 डिसेंबर रोजी कळंबोली मध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे वाढदिवसानिमित्त कळंबोली मधील सेक्टर 4 येथील उद्यानात महिलांसाठी खेळ पैठणीचा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे या कार्यक्रमांमध्ये विविध बक्षिसे वितरित केली जाणार आहेत त्याचबरोबर कराओके गाण्यांचा सुद्धा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे रात्री साडेआठ नंतर अभिष्टचिंतनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे या सर्व कार्यक्रमासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब आमदार प्रशांत दादा ठाकूर सभागृह येथे परेश ठाकूर माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील जिल्हा सचिव रवी शेठ पाटील महिला आघाडी जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील मा नगरसेवक श्री रवी शेठ भगत अशोक मोटे मोनिका महानवर सरस्वती कथारा व मंडळातील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते विविध मंडळाचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत . तरी आपण सर्व मंडळींनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे व बबन बारगजे यांना शुभ आशीर्वाद द्यावेत असे आवाहन भाजपा कळंबोली चिटणीस सौ बायजा बबन बारगजे यांनी केले आहे .




## पूर्वनियोजन बैठक व नावनोंदणी कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी प्रकाश गवारे** : "शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा" या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणादायी विचारातून भारतीय बौद्ध महासभा नांदेड (उत्तर) व भारतीय बौद्ध महासभा मुदखेड यांच्या संयुक्त विद्यमाने समता सैनिक दलाच्या भव्य प्रशिक्षण शिबिराच्या आयोजनासाठी पूर्वनियोजन बैठक व नावनोंदणी कार्यक्रम शनिवार, दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी मुदखेड बुद्धभूमी प्रशिक्षण केंद्रात मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन धम्माचे धम्मगुरू पुज्य भदंत गगनबोधी भंतेजी यांच्या हस्ते झाले. यावेळी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सामुदायिक पंचशील वंदना घेण्यात आली.



कार्यक्रमास आनंद झडते (कर्नल मेजर), आनंद जोंधळे (संरक्षण सचिव, समता सैनिक दल), संतोष सोडारे, प्रकाश सोडारे, तसेच भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा, तालुका व शहर पातळीवरील पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये प्रशांत निखाते (अध्यक्ष, भा.बौ.म. ता. मुदखेड), बोध्दाचार्य संभाजी थोरात, बोध्दाचार्य नागोराव लोखंडे (तालुका सरचिटणीस), बाळकृष्ण चौदंते (ता. स्वसंरक्षण सचिव), उपासक मधुकर खंडेलोटे (युनिट लीडर), उपासक मनोज पवळे (तालुका संघटक) यांचा समावेश होता.

या कार्यक्रमात "गाव तिथे शाखा – घर तिथे सैनिक" या संकल्पनेनुसार समाज संघटनासाठी ५० युवकांनी समता सैनिक दलात प्रवेश केला. समता सैनिक दलाच्या माध्यमातून समाज संरक्षण, शिस्तबद्ध जीवनशैली, व्यसनमुक्ती व आंबेडकरी विचारधारेचे बळकटीकरण हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे मान्यवरांनी स्पष्ट केले.कर्नल मेजर आनंद झडते यांनी समता सैनिकांना शिस्त, शारीरिक तंदुरुस्ती व संघटनात्मक बांधिलकीबाबत मार्गदर्शन केले. संरक्षण सचिव आनंद जोंधळे यांनी नांदेड जिल्ह्यात २००० समता सैनिक उभारण्याचे उद्दिष्ट असून, २०२७ मध्ये महाराष्ट्रात दोन लाख समता सैनिकांची फळी उभारणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमादरम्यान सर्व समता सैनिकांना एक तासाची परेड ड्रिल देण्यात आली. शिस्तबद्ध परेड सादर करून मान्यवरांना सलामी देण्यात आली व "जय भीम"च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.मुदखेड येथील उपासक सुभाष चौदंते यांनी दोन समता सैनिकांना पूर्ण गणवेश व साहित्य देण्याची घोषणा केली. तसेच उपासक आप्पा चौदंते व इतर धम्मबंधूंनी भोजन व्यवस्थेची जबाबदारी पार पाडली.

कार्यक्रमाचा समारोप अध्यक्ष प्रशांत निखाते यांच्या भाषणाने झाला. प्रा. संभाजी थोरात यांनी उपस्थित मान्यवर, पदाधिकारी व समता सैनिकांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बोध्दाचार्य नागोराव लोखंडे यांनी प्रभावीपणे केले.या प्रसंगी सर्व तरुण बांधव, बौद्ध उपासक-उपासिकांना समता सैनिक दलात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले."समता सैनिक दलात सामील व्हा… संघटना मजबूत करा!"




## लाडक्या बहिणींना 'ई-केवायसी' दुरुस्तीसाठी मिळणार एकच संधी – मंत्री अदिती तटकरे

**दैनिक युवक आधार**

**नागपूर :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांना ई-केवायसी प्रक्रियेदरम्यान झालेल्या चुका दुरुस्त करण्यासाठी अंतिम आणि एकमेव संधी देण्यात येणार आहे. महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी शनिवारी याबाबत महत्त्वपूर्ण घोषणा केली असून, ही सुधारणा प्रक्रिया ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करणे बंधनकारक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. योजनेच्या बहुतांश लाभार्थी दुर्गम आणि ग्रामीण भागातील असल्याने ई-केवायसी करताना चुका होणे स्वाभाविक आहे. अशा चुका दुरुस्त करण्याबाबत विभागाकडे अनेक निवेदने प्राप्त झाली होती. महिला सक्षमीकरणाच्या उद्देशाने राबविल्या जाणाऱ्या या योजनेत लाभार्थींना संधी देणे गरजेचे असल्याने, ई-केवायसीमध्ये केवळ एकदाच सुधारणा करण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे. तसेच, पती किंवा वडील हयात नसलेल्या किंवा घटस्फोटित महिलांना ई-केवायसी प्रक्रिया स्वतः पूर्ण करण्यासाठी पोर्टलवर विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आवश्यक कागदपत्रे सादर करून या महिलांना योजनेचा लाभ सुरळीत मिळावा, यासाठी विभाग प्रयत्नशील आहे. ई-केवायसी प्रक्रिया अधिक सुलभ व सोपी करण्याबरोबरच जास्तीत जास्त लाडक्या बहिणींना योजनेचा लाभ मिळावा, यासाठी महिला व बालविकास विभाग कटिबद्ध असल्याचे मंत्री तटकरे यांनी सांगितले.

## सुवर्ण भरारी बहुउद्देश्य सेवाभावी संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय 2025 कलारत्न पुरस्कार अभिनेते दिग्दर्शक प्रमोद पंडित यांना देण्यात आला

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर :** सुवर्ण भरारी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने अभिनेता प्रमोद पंडित यांना धर्माचार्य श्री श्री श्री 1008 महामंडलेश्वर दत्तात्रेय दहिवाल महाराज यांच्या शुभहस्ते कलारत्न पुरस्कार ने सन्मानित केले यावेळी भावड्या चित्रपटाचे शुभ मुहूर्त करताना , विखे फाउंडेशन अध्यक्ष,धनश्रीताई सुजयदादा विखे पाटील डॉ. सारिका ताई नागरे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी, अभिनेत्री सिद्धी गाडेकर कलाकार ज्ञानदेव शिंदे ,कैलास धनवटे ,, निर्माता आबा निर्मळ, पत्रकार प्रसाद मैड , बोराडे, ज्ञानेश्वर साबळे,,रवी माळवे, डॉ. बेंद्रे श्रीकांत सी ए डॉ.शंकर अदानी, अजय नागरे संदीप मानकर राजेंद्र कुलथे अनिता ताई माळवे स्वातीताई मुंडलिक श्यामभाऊ, गोसावी, श्रीनिवास बनकर अंबादास धनगर पवनराजे गायकवाड, बालाजी पोतदार, उमेश काजळे, अभिजीत पेडगावकर, अशोककाका मैड नारायण लोळगे मेजर शेवंती,गोकुळ चिंतामणी साहेब , श्रीपाद बोकंद सोमनाथ आहेर उपस्थित होते पुरस्कारावेळी अनेक प्रेक्षकांच्या टाळ्यांचा कडकडाट पहावयास मिळाला पुरस्कारामुळे मान्यवरांनी अभिनेते प्रमोद पंडित यांचे खूप कौतुक करत त्यांच्या भावी वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा.



# थंडीचा ‘दूध’ उत्पादनावर गारठा!

## सिल्लोड तालुक्यात घट, पशुपालक चिंतेत

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड:** चालू वर्षी थंडीने चांगलाच जोर धरल्याने माणसांप्रमाणेच पशुधनावरही त्याचा परिणाम दिसून येत आहे. सिल्लोड तालुक्यात सध्या वाढलेल्या थंडीमुळे दुधाच्या उत्पादनात मोठी घट झाली असून, याचा थेट फटका येथील पशुपालकांना बसला आहे.

अचानक तापमान घटल्यामुळे जनावरांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. विशेषतः दुभत्या जनावरांना थंडीचा त्रास अधिक जाणवत असल्याने, त्यांच्या दैनंदिन दूध देण्याच्या क्षमतेत सरासरी १० ते १५ टक्क्यांपर्यंत घट झाल्याची माहिती पशुसंवर्धन विभागाने दिली आहे. यामुळे तालुक्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या दूध व्यवसायावर मोठे संकट आले



आहे.

ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांची उपजीविका दुग्ध व्यवसायावर अवलंबून आहे. दूध उत्पादनात घट झाल्यामुळे पशुपालकांचे दररोजचे उत्पन्न कमी झाले आहे. दुसरीकडे जनावरांना थंडीपासून वाचवण्यासाठी शेडमध्ये गोणपाट, ताडपत्री लावणे, तसेच त्यांच्या आहारात पोषक पदार्थांची भर घालणे यासारख्या उपाययोजनांवर पशुपालकांना जास्तीचा खर्च करावा लागत आहे. त्यामुळे 'दुहेरी नुकसान' सोसावे लागत असल्याची खंत अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

दूध संकलन केंद्रे आणि डेअरी व्यावसायिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, थंडी वाढल्यापासून दूध संकलनाचे प्रमाण सातत्याने घटत आहे. बाजारात दुधाची मागणी कायम असताना, पुरवठा कमी झाल्याने भविष्यात दुधाच्या दरात वाढ होण्याची शक्यताही वर्तवली जात आहे.पशुसंवर्धन विभागाने पशुपालकांना जनावरांना उबदार ठिकाणी ठेवण्याचे आणि संतुलित पशुखाद्य देण्याचे आवाहन केले आहे. तसेच, जनावरांमध्ये न्यूमोनियासारखे आजार पसरू नयेत यासाठी विशेष काळजी घेण्याची गरज व्यक्त केली आहे. थंडीचा कडाका असाच कायम राहिल्यास, दूध उत्पादनाची ही घट आणखी वाढण्याची भीती आहे, ज्यामुळे सिल्लोड तालुक्याच्या दूध अर्थव्यवस्थेसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

# निफाड महाविद्यालयाला खेलो इंडिया मध्ये पुन्हा सुवर्ण आणि रौप्य पदक

## देशपातळीवरील सुवर्ण व रौप्य पदक हे ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी प्रेरक स्त्रोत - मविप्र सभापती बाळासाहेब क्षीरसागर

**दैनिक युवक आधार**

**नाशिक (राहुल कुलकर्णी) :**भारतातील सर्व राज्यातील आयोजित चौथ्या खेलो इंडिया आंतर विद्यापीठ गेम्स ॲथलेटिक्स मधील ट्रिपल जंप व लॉंग जंप मध्ये भूषण शिंदे याला महाराष्ट्रात अनुक्रमे सुवर्ण पदक आणि रौप्य पदक प्राप्तभारतातील सर्व राज्यातील आंतर विद्यापीठ खेलो इंडिया गेम्स २०२५ या अंतर्गत विविध क्रीडा प्रकाराच्या स्पर्धा उदयपूर राजस्थान येथे दि. २८ नोव्हेंबर ते ०४ डिसेंबर या कालावधीत संपन्न झाल्या. यामध्ये मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा कला शाखा मराठी विभागाचा खेळाडू कु. भूषण शिंदे याने ॲथलेटिक्स मधील ट्रिपल जंप व लॉंग जंप या क्रीडा प्रकारात, महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करत उत्कृष्ट कामगिरी



**सुवर्ण व रौप्य पदक विजेता भूषण शिंदे आणि कायकिंग मध्ये यशस्वी सर्व खेळाडू यांचा यथोचित सत्कार प्रसंगी मविप्र सभापती बाळासाहेब क्षीरसागर, प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे, प्राचार्य स्नेहल जाधव, प्रा. चंद्रशेखर मोरे, प्रा. चेतन कुंदे, डॉ. सुसान लॉरेन्सिया, डॉ. प्रवीण ढेपले, डॉ. महेश बनकर, प्रा. योगेश कडलग, डॉ. सुरेखा जाधव, प्रा. अतुल आहेर, प्रा. सुनिता बोरडे आदी**

बजावत अनुक्रमे सुवर्णपदक व रौप्य पदक यांची नेत्रदीपक कमाई केली आहे.तसेच कायकिंग (के - फोर) या क्रीडा प्रकारात निफाड महाविद्यालयाच्या बोट क्लबचे खेळाडू कुणाल खापरे, प्रथमेश शिंदे, विशाल घोलप, व साक्षी मोगल यांनी उत्तम कामगिरी करत भारतातील सर्व विद्यापीठातून चौथा क्रमांकाचा बहुमान मिळवला. खेळाडूंना चंद्रशेखर मोरे व चेतन कुंदे यांचे मार्गदर्शन लाभले.या यशाबद्दल अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वासजी मोरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती देवराम मोगल, सरचिटणीस ॲड. नितीनजी ठाकरे, चिटणीस दिलीप दळवी, संचालक शिवाजी गडाख, महिला संचालक शोभाताई भागवत बोरस्ते प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे, महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक आणि सेवक वृंद सर्वांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

या यशाबद्दल मविप्र सभापती बाळासाहेबजी क्षीरसागर यांनी निफाड महाविद्यालयात प्रत्यक्ष खेळाडूंची भेट घेऊन यशस्वी खेळाडूंच्या पाठीवर शाबासकीची थाप देऊन, सर्वांचा यथोचित सत्कार केला. यावेळी त्यांनी खेळाडूंशी मुक्त संवाद साधला, खेळाडू व मार्गदर्शकांनी अधिक मेहनत घ्या, नियमित सराव करा आणि सतर्क राहा अश्या सूचना केल्या, मविप्र संस्थेची व निफाड महाविद्यालयाची यशस्वी आणि उज्वल परंपरा राखण्याचे सर्वांचे सांघिक दायित्व आहे. देशपातळीवरील सुवर्ण आणि रौप्य पदक ही निश्चितच सर्वांसाठी मोठी प्रेरणा ठरेल असा विश्वास व्यक्त केला.

मविप्र सभापती बाळासाहेब क्षीरसागर

# धान शेतकऱ्यांना २० हजार बोनस, पोलाद कारखाना, ५० हजार घरे द्या

## गोंदियाचे जनतेचे आमदार विनोद अग्रवाल यांनी विधानसभेत वेधले सरकारचे लक्ष

**दैनिक युवक आधार**

**गोंदिया (सचिन बन्सोड) :** नागपूर, प्रतिनिधी महाराष्ट्र विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात शुक्रवारी गोंदिया मतदारसंघाचे आमदार तथा जनतेचे आमदार विनोद अग्रवाल यांनी सलग अनेक ध्यानाकर्षण सूचना देऊन भागातील जनतेच्या प्रमुख मागण्या सरकारसमोर मांडल्या. श्री. अग्रवाल यांनी सर्वप्रथम धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टर २० हजार रुपये बोनस देण्याची मागणी केली. “गोंदिया हा धानाचा कटोरा आहे, पण शेतकऱ्यांना खर्चही निघत नाही,” असे ते म्हणाले. धानाचा बोनस दिल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळतो. बेमोसमी पाऊस व अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई दिल्याबद्दल त्यांनी सरकारचे आभारही मानले. तसेच जंगली प्राण्यांपासून पीक वाचवण्यासाठी १०० टक्के शासकीय अनुदानावर ‘खेत कंपाउंड योजना’ सुरू करण्याची मागणी केली.

गोंदिया जिल्ह्यात शासकीय कृषी महाविद्यालय व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय लवकर सुरू करावे, तसेच





बेरोजगारी थांबवण्यासाठी गडचिरोलीच्या धर्तीवर मोठा पोलाद कारखाना उभारावा, अशी मागणीही त्यांनी लावून धरली.

ते म्हणाले, “आमचे तरुण रोजगारासाठी इतर राज्यांत स्थलांतर करत आहेत. स्थानिक पातळीवरच मोठे उद्योग आले तर स्थलांतर थांबेल.”

शहरातील झोपडपट्टी, जंगल-आबादी व नजूल जमिनीवरील हजारो कुटुंबांना कायमस्वरूपी पट्टे द्यावेत, जिल्हा परिषद शाळांमधील रिक्त शिक्षक पदे तात्काळ भरावीत आणि गोंदिया शहरातील कचरा व्यवस्थापनासाठी ठोस पावले उचलावीत, असेही त्यांनी सांगितले.

आंगणवाडी सेविका, आशा व्हॉलंटियर, उमेद कर्मचारी, समग्र शिक्षा अभियान कर्मचारी, सीआरपी भगिनी, कोतवाल आदी सर्व आंदोलनकर्त्या कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्या तात्काळ मान्य कराव्यात, अशी अपीलही श्री. अग्रवाल यांनी केली. “हे सर्वजण समाजसेवा करत आहेत, त्यांच्या मागण्या दुर्लक्षित करता येणार नाहीत,” असे ते म्हणाले.

ओबीसी, आदिवासी व अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी आधीच निश्चित केलेल्या जागी वसतिगृहांचे बांधकाम लवकर सुरू करावे आणि आवास योजनेअंतर्गत गोंदिया शहरात १० हजार तर ग्रामीण भागात ४० हजार अतिरिक्त घरे मंजूर करावीत, अशी मागणीही त्यांनी जोरदारपणे मांडली.

सभागृहात बोलताना आमदार विनोद अग्रवाल म्हणाले, “या मागण्या नव्या नाहीत. जनता गेली अनेक वर्षे त्या मांडत आहे.

आता वेळ आली आहे की सरकार त्यांना प्राधान्य देऊन पूर्ण करेल.”

# जागा एकीकडे आणि बांधकाम दुसरीकडे ठेकेदाराचा प्रताप

## घोलपवाडी येथे 'जलजीवन'च्या कामाला ग्रामस्थांचा विरोध

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्याच्या पश्चिम भागातील १४ गावांसाठी पवारवाडी ग्रामपंचायतीच्या अंतर्गत राबवण्यात येणाऱ्या उद्धट प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेत जलजीवन मिशनचे काम सुरू आहे.मात्र या कामात होत असल्याचा आरोप असलेल्या अनियमितता आणि ग्रामस्थांना न घेता होत असलेल्या निर्णयांमुळे घोलपवाडीतील ग्रामस्थांचा तीव्र विरोध निर्माण झाला आहे.१४ गावांसाठी असलेल्या या प्रादेशिक योजनेतील तलाव आणि पाण्याच्या टाक्यांच्याबांधकामाबाबत ग्रामस्थांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

नियोजित ठीकाणाऐवजी इतर ठिकाणी तलाव व टाक्या बांधल्या जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. पवारवाडी ग्रामपंचायतीने तात्पुरत्या तलावासाठी दिलेल्या जागेची मंजुरी नंतर 'पक्का तलाव' म्हणून करण्यात आल्याने नागरिकांमध्ये संताप वाढला आहे.काही दिवसांपूर्वी पवारवाडीतील ग्रामस्थांनी या प्रकल्पातील अनियमिते विरोधात उपोषणही केले होते.त्या वेळी कार्यकारी अभियंता अर्जुन नाडगौडा आणि उपविभागीय अभियंता माधवी गरुड यांनी भेट देऊन उदमाई देवी मंदिर परिसरातील पाण्याच्या टाकीचे व साठवण तलावाचे काम तात्पुरते स्थगित केले होते. मात्र दोन महिन्यांनंतर जिल्हाधिकारी कार्यालयात ग्रामस्थांना न बोलावता बैठक घेऊन स्थगिती उठविण्यात आली आणि काम पुन्हा सुरू करण्यात आले. यावर ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. घोलपवाडीतील महत्त्वाची जागा तसेच उदमाई देवी मंदिराचे आवार या योजनेसाठी वापरले जात असल्याने स्थानिकांमध्ये नाराजी पसरली आहे,अनेक वर्षापासून एका तलावावर आधारित योजना असताना, अचानक दोन तलावांची गरज का निर्माण झाली,असा ग्रामस्थ विचारत करत आहेत. प्रस्तावित तलावाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होण्याची शक्यता असल्याने पर्यावरण हानीची स्थानिकांनी चिंता व्यक्त केली आहे.

या प्रकरणासाठी घोलपवाडीतील सुमारे ५ एकर जागा आरक्षित करण्यात आली आहे.या जागेच्या अभावी भविष्यात देवी यात्रेसह गावातील इतर विकासकामांसाठी जागा शिल्लक राहणार नसल्याने ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. लवकरच याविरोधात मोठे आंदोलन छेडण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

# पाटोदा साठवण तलाव अनुदान घोटाळा प्रकरणी अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करा - दिपक डोके वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाधिकाऱ्याला निवेदन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी** : मंठा तालुक्यातील साठवण तलाव बाधीत मोजे लिंबे वडगाव येथील अनुदान घोटाळा प्रकरणी बोगस लाभार्थी , सरपंच ग्रामसेवक सगंनमत करणारे संबंधित अधिकारी यांच्यावर निलंबिनाची कार्यवाही करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करा या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जालन्याचे जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांना निवेदन देण्यात आले आहे निवेदनावर वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके अचित जाधव श्रिरंग खरात बालासाहेब विभुते उद्धव भीमराव खरात सिद्धेश्वर



होळकर बाबासाहेब अवचार अंकुश होळकर किसन होळकर दत्ता सुभान देवकते आश्रुबा जाधव शिवाजी चव्हाण प्रकाश प्रताप रामभाऊ जाधव विश्वनाथ बालटकर माऊली पितळे प्रसाद बुद्दे सुरेश छगन जाधव प्रभाकर हनपटे अशोक जाधव सुधाकर जाधव दीपक बबन विजू जाधव बाळू डोंबे तुकाराम सखाराम जाधव आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# सदगुरु श्री .श्री .साखर कारखान्याचे चेअरमन एन शेषागिरी राव (अंकल) यांना मातृ शोक

**दैनिक युवक आधार**

**पिलीव प्रतिनिधी (रघुनाथ देवकर) :** सध्याच्या स्पर्धेच्या युगात वेगवेगळ्या औद्योगिक क्षेत्रामध्ये दिवसेंदिवस प्रगतीचा आलेख उंचावत राव (नर्रा) कुटुंबाने औद्योगिक क्रांती केलेली आहे. त्यातच सद्गुरु श्री. श्री. साखर कारखाना लि. राजेवाडीचे (श्री श्रीनगर) चेअरमन एन .शेषागिरी राव (अंकल) यांच्या मातोश्री श्रीमती सौभाग्यवती नर्रा (राव) यांचे वयाच्या ८३ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाल्याने राव (नर्रा) परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या जाण्याने इंटलेक्स उद्योग समूह, सद्गुरु परिवारामध्धे मोठी पोकळी निर्माण झाली आहे.



त्यांच्या मृत्यूची बातमी समजताच त्यांचे नातेवाईक ,आप्तस्वकीय, सगे सोयरे व समाजातील सर्व घटकांमधून आणि राजकीय, सामाजिक,शैक्षणिक, औद्योगिक तसेच दि आर्ट ऑफ लिविंग परिवारातील सदस्यांनी अंत्यदर्शनासाठी बहुगर्दी केल्याचे दिसून आले. त्यांचा स्वभाव मनमिळावू असल्याने त्यांनी अनेकांना मायेची सावली दिल्याचे व आपुलकीच्या भावनेतून अनेकांना मदतीचा हात दिला असल्याचे उपस्थितांनी बोलून दाखवले. त्यांच्या पश्चात तीन मुले ,तीन सुना, नातवंडे, नातसुना असा मोठा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने त्यांच्या आठवणींना उजाळा देऊन अनेकांनी दुःख व्यक्त केले.

# शिवसंकल्प समालोचक असोसिएशनची वार्षिक सभा आणि नवीन कार्यकारिणी निवड

**दैनिक युवक आधार**

**उरण प्रतिनिधी (हेमाली म्हात्रे)** : शुक्रवार, दिनांक 12 डिसेंबर 2025 रोजी रात्री 8 वा. असोसिएशन ची दुसरी वार्षिक सर्वसाधारण सभा असोसिएशन चे सल्लागार राजेंद्र भगत यांच्या चिरनेर निवासस्थानी पार पडली. सभेस 14 सदस्य उपस्थित होते. सर्व सदस्य उपस्थित झाल्यानंतर सभा सुरू होण्याआधी चिरनेर च्या विकासाचे महामेरू पी. पी. खारपाटील कन्स्ट्रकशन चे उपाध्यक्ष मा. राजाशेठ खारपाटील यांना त्यांच्या निवासस्थानी जाऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. रायगड भूषण नितेश पंडित सरांनी असोसिएशन च्या सामाजिक उपक्रमाची माहिती देऊन या असोसिएशन वर आपलाही कृपा हस्त असावा अशी विनंती केली. उत्सव मूर्तींनी सर्वोतोपरी सहकार्य लाभेल,असे आश्वासन दिले.

सभेच्या सुरुवातीस सचिव सुनिल वर्तक यांनी उपस्थितांचे शब्दसुमनानी स्वागत करून असोसिएशन च्या दोन वर्षाच्या कालावधीतील सामाजिक कार्याचा आढावा घेऊन असोसिएशन ची स्थापना होताना कार्यकारिणी चा कार्यकाळ दोन वर्षाचा होता



तो आज संपत आहे, हे सांगून नवीन कार्यकारिणी निवड करताना अध्यक्षांनी हे पद पुन्हा स्विकारून बाकी पदे नवीन भरू असे सुचविले, पण नितेश पंडित सर यांनी सांगितले की सर्वांना पद उपभोगावयास मिळावे, या हेतूने नवीन कार्यकारिणी निवडू त्यानुसार नवीन कार्यकारिणी निवडण्याचे सर्वाधिकार हे नितेश पंडित सरांना दिले..

त्यांनी सुचविलेल्या नावानुसार राजेंद्र भगत यांची अध्यक्षपदी तर हेमाली म्हात्रे यांची उपाध्यक्ष पदी तर सुनिल वर्तक यांची सचिवपदी (फेर निवड) आणि पिंट्या ट्या घरत यांची खजिनदार पदी बिनविरोध निवड झाली...

माजी अध्यक्ष नितेश पंडित सरांनी कायम स्वरुपी सल्लागार पद स्विकारावे असे सर्वानुमते ठरले...

**नवीन कार्यकारिणी सभासद**

मावळते खजिनदार जीवन डाकी सर यांनी जमा खर्चाचे वाचन केले.

त्यास सर्वांनी मान्यता दिली, असोसिएशन च्या सदस्यांची एक परिवारासोबत एकदिवसीय ट्रिप आयोजित करू असे नितेश पंडित सरांनी सांगितले.

नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. राजेंद्र भगत सर यांनी येत्या काही दिवसात रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष मा. महेंद्रशेठ घरत साहेब यांची भेट घेऊन त्यांच्याकडून असोसिएशन ला भरघोस आर्थिक मदत मिळवू अशी आशा व्यक्त केली. या सभेच्या संपूर्ण खर्चाचा आर्थिक भार नवनिर्वाचित अध्यक्ष . राजेंद्र भगत सर यांनी उचला. विशेष म्हणजे चविष्ट पोपटी बनविणाऱ्या राजेंद्र भगत सरांचे मोठे बंधू रवी दादा यांचे पोपटी खाताना सर्वांनी कौतुक केले.. आणि आभारही मानले

शेवटी असोसिएशन चे मावळते उपाध्यक्ष श्री. श्याम ठाकूर सर यांनी उपस्थितांचे आणि आयोजक तथा अन्नदाता सुखी भव या उक्तीनुसार राजेंद्र भगत सर यांच्या सौभाग्यवती स्वाती वहिनी आणि परिवाराचे आभार मानले.

आभार विषयावर नवनिर्वाचित उपाध्यक्षा आणि कवयत्री हेमाली मॅडम यांनी छान काव्यपंक्ती करून शेवटी.. एक ग्रुप फोटो काढून सभा समाप्त झाली.

दैनिक युवक आधार हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# आबाचा जीवन प्रवास

# सालगडी ते दहा एकर शेत जमिनीचे मालक - आबा

**दैनिक युवक आधार**

**रमेश सुरशे (छत्रपती संभाजीनगर)** : पायी अनवाणी चालणे ते टू व्हीलर,फोर व्हीलर मध्ये फिरणारे आबा

मातीचे घर ते दोन-दोन बंगल्यात राहणारे आबा

आबा

माझे सर्वस्व,माझे आबा



आबांचा जन्म बापूराव व भागूबाई यांच्या पोटी अंदाजे 1935 साली शेतकरी कुटुंबात झाला.आबाच्या कुटुंबात दोन भाऊ आणि एक बहीण असे चार जण होते त्यापैकी आबा सर्वात लहान होते.आबांचे मोठे भाऊ रामभाऊ,दोन नंबरचे भाऊ दामोदर तीन नंबरची बहीण आसराबाई

आबा लहानपनापासून खूप कष्टाळू ज्या वयात शाळेत जायचं त्याच वयात आबाला गुरे ढोर सांभाळण्यासाठी जावं लागलं. आबानी वयाच्या अवघ्या 10-12 वर्षांपासून शेतात काम करायला सुरुवात केली.शेतात कामधंदा करता करता वयाच्या 16 व्या वर्षीच आबांचे लग्न झाले.आबांची पहिली सासुरवाडी परतूर तालुक्यातील नांदरा या गावाची होती. आबांच्या पहिल्या पत्नीचे नाव मंजुळा होते. त्या ताटे परिवारातील होत्या.

आबा व मंजुळाबाई यांना दोन मुलं झाली. एक मुलगा आणि एक मुलगी परंतु लहान वयात लग्न झाल्यामुळे आबांचे दोन्ही मुलं एक एक वर्षांचे असतांनाच वारले आणि पहिल्या पत्नीचेही निधन झाले.

पहिल्या पत्नीचे त्यांच्या पासून झालेल्या अपत्य यांचे निधन झाल्यानंतर आबांचे दुसरे लग्न बदनापूर तालुक्यातील *बदापूर* येथील एखंडे परिवारातील पुंजाराम एखंडे यांची जेष्ठ कन्या शोभा यांच्याशी झाले आणि त्याच आमच्या आईसाहेब आमच्या आई शोभाबाई यांच्या कुटुंबात चार बहिणी आणि एक भाऊ असे पाच जणांचे कुटुंब पुंजाराम व कलाबाई यांना एकूण पाच अपत्य होती त्यापैकी आमच्या आई ह्या सगळयात मोठ्या होत्या.आबा आणि आमच्या आई यांचे लग्न झाले. त्यावेळी आबांचे वय होते 40 वर्षे आणि आमच्या आईचे वय होते 14 वर्षे आई आणि आबा यांना एकूण सहा अपत्ये झाली त्यापैकी एक वारले आमच्या मोठ्या बहिणीच्या जन्मानंतर आमच्या आजोबांचे म्हणजेच आईच्या वडिलांचे निधन झाले.मोठ्या बहिणीनंतर आई आणि आबांना मुलगा झाला परंतु तो सहा महिन्यातच वारला त्याच्या नंतर माझा जन्म झाला.माझ्या जन्माच्या वेळी आईच्या आईचे म्हणजेच माझ्या आजीचे निधन झाले आणि माझ्या आईसह माझ्या तीन मावश्या आणि एक मामा अनाथ झाले आईचे आई आणि वडील वारले तेव्हा आई ची सर्वात लहान बहीण 5 वर्षाची होती एक भाऊ 8 वर्षाचा एक बहीण 10 वर्षीची तर पुन्हा एक 13 वर्षाची आबांनी आईच्या तीनही बहिणींना आणि भावाला स्वतःच्या लेकरसारखं जपलं.त्यांना लहानच मोठं केले त्यांचे लग्न लावून दिले.

माझ्या नंतर आई आणि आबांना तीन अपत्ये झाली आणि आमची एकूण कुटुंबातील संख्या झाली आम्ही पाच, मावश्या तीन,एक मामा,आई आणि वडील असे एकूण 13 म्हणजे त्या वेळी 10-12 जणांना पालन पोषण करण्यासाठी आमचे आबा दिवस रात्र काम करायचे त्यांच्या सोबतीला आमची आई ही तितक्याच जोमाने काम करायची.

आमचे आबा आयुष्यभर शेतात राबणारे, मातीशी नाळ जुळवून जगणारे खरे अर्थाने अन्नदाता होते. पहाटेच्या पहिल्या प्रकाशासोबत ते कामाला निघत आणि रात्रीपर्यंत आपल्या शेताची काळजी घेत. त्यांच्या घामाच्या थेंबांनी आमच्या घराला आधार मिळाला.

आबांनी रात्र आणि दिवस काम करून आम्हाला लहानच मोठं केलं आयुष्यभर आबांनी लोकांच्या घरी सालगडी म्हणून काम केलं.सालगडी म्हणून काम करत असताना आबांनी प्रामाणिकपणा खूप जपला ते ज्यांच्या कडे सालाने राहायचे त्यांचे काम प्रामाणिकपणाने,जबाबदारीने ,स्वतःचं काम म्हणून करायचे. आबांनी आयुष्यभर इमानदारीने काम केले आणि त्यांच्या इमानदारीची शिकवण आम्हाला देऊन गेले.त्यांच्या इमानदारी मुळेच आज आम्ही सुखात आहोत.उभ्या आयुष्यात त्यांनी 40 वर्षे सालगडी म्हणून काम केले

माझ्या मोठ्या बहिणीचे लग्न वयाच्या अवघ्या 14 व्या वर्षीच आई आणि आबांनी लावून दिले त्यावेळी मी चौथ्या वर्गात होतो.ताईचे लवकर लग्न लावून देण्याचं कारण म्हणजे आमची आर्थिक परिस्थिती. आबांना वाटत होतं मला चार चार मुलींचे लग्न करायचे आहेत त्यामुळं एक एक मुलीचं लग्न लवकर लवकर करून मोकळं व्हावं.आबांचे कष्ट,मेहनत,त्यांचा प्रामाणिकपणा ,त्यांची इमानदारी, त्यांची कुटुंबाप्रति जबाबदारी मी डोळ्यांनी पाहत होतो.घरात अठरा विश्व दारिद्र्य असतांना आबांनी आम्हाला शिकविले,गावात परगावात आबांनी सालगडी म्हणून काम केले.मी पाच वर्षांचा असतांना आबांनी जालन्याच्या रमेश तवरवाला यांच्या शेतात सालगडी म्हणून काम धरले तिथे दोन वर्षे काम केले.मारवड्याला आबांचे काम खूप आवडले होते परंतु गावाकडच्या ओढीने आबा परत बोररांजनीला आले आणि आमच्या शिक्षणाचा श्रीगणेशा जिल्हा परिषदेच्या शाळेत सुरू झाला आणि आबांनी शिक्षकांना सांगितले हा आता तुमच्या हवाली याच काय करायचं ते करा.शाळेत नाव टाकल्यापासून आबांनी शाळेकडे फिरून पाहिले नाही कारण आबाकडे तेव्हढा वेळ नव्हता कारण सालगडी असल्याने आबा आम्ही शाळेत जाण्याच्या अगोदरच शेतात निघून जायचे आणि आम्ही रात्री झोपल्यावर यायचे असे त्यावेळी काम करावं लागतं होत.

आबांनी आयुष्यभर प्रामाणिकपणा, कष्ट आणि संयम ही मूल्ये जपली. परिस्थिती कितीही कठीण आली तरी त्यांनी कधी हार मानली नाही. दुष्काळ असो, पावसाचे अनियमित दिवस असोत किंवा बाजारभावाची घसरण—ते नेहमी हसतमुखाने काम करत राहिले.

त्यांच्या हातातील कणखरतेसारखेच मन मात्र कोमल होते—गरजूंना मदत करणे, शेजाऱ्यांच्या अडचणींना धावून जाणे ही त्यांची स्वभाववैशिष्ट्ये होती.कोणाच्या ही लग्न कार्यात आबा हजर असत.

घरात ते आमच्यासाठी काळजी करणारे, योग्य मार्गदर्शन करणारे, शांतपणे आपली जबाबदारी पार पाडणारे समजूतदार आधारस्तंभ होते. आम्हाला शिक्षण दिले, संस्कार दिले आणि कष्टाला सन्मान देण्याची शिकवण दिली.माझे दहावी पर्यंतचे शिक्षण झाले मी प्रथम आलो त्यावेळी आबांचे कष्ट करण्याची ताकद दुप्पट झाली आणि मला ते म्हणाले,"भाऊ मी जमीन विकतो पण तू चांगला शिक" आणि तेच शब्द मी कायम लक्षात ठेवले.आबांची ताकद ,आर्थिक परिस्थिती नसतांना ही आबांनी मला 11 वी 12 वी साठी जालना येथे शिक्षणासाठी पाठविले.कोणती स्वप्न पाहिली असतील आबांनी?? कोणत्या अपेक्षेने मला शिक्षणासाठी परिस्थिती नसतांनाही ठेवले असेल हे काही मला कळले नाही.ज्या वेळी मला रूम करून जालन्याला ठेवले त्यावेळी रूम चे किराया देण्यासाठी पैसे नसतांना आबांनी वर्षेभराचे किराया साठी घर मालकाला गहू दिले आणि त्यामधून किराया दिला बारावीला अभ्यास करतांना मला माझ्या नजरेसमोर माझ्या आबांचे कष्ट दिसत होते,त्यांची मेहनत दिसत होती त्यांच्याच आशीर्वादाने मला बारावीला 80% मार्क पडले आणि माझा डी एड ला नंबर लागला. डी एड ला नंबर लागल्यावर तर आबाला दहा हत्तीचं बळ आलं आणि वयाच्या 70 वर्षात ही आबा पुन्हा जोमाने काम करू लागले.कारण माझं शिक्षण आणि बहिणींचे लग्न,शेतातील विहिरीचे काम हे सोबतच आले होते.

माझं डी एड आबांनी 5 रुपये,10 रुपये टक्क्यांनी पैसे काढून पैसा उभा केला शिक्षणासाठी खर्च एव्हडा झाला की आबांना अर्धा एकर शेती विकावी लागली.

डी एड पूर्ण झाल्यावर मला नोकरी लागली आणि आबांना इतका आनंद झाला की आबांनी गावभर ताशा लावून पेढे वाटप केले.

मला नोकरी लागली आणि आबांनी आयुष्यभर केलेल्या कष्टाचं फळ मिळाले. मला नोकरी लागली तेंव्हा आबांचे वय होते 75 वर्षे. सुरुवातीला शिक्षण सेवक असल्यामुळं मला 3 हजार रुपये पगार होता परंतु तरी सुद्धा आबाला माझा हातभार लागायला सुरुवात झाली. नोकरी लागल्यावर एका वर्षाच्या आत माझ्या बहिणीचे लग्न आम्ही केले. बहिणीचे लग्न झाल्यानंतर आबांनी माझे लग्न करायचा निर्णय घेतला आणि माझ्यासाठी मुलीचा शोध सुरू झाला.आबांची ईच्छा होती मुलगा नोकरीला आहे तर मुलगी सुद्धा नोकरीवालीच करायची आणि त्यांच्या इच्छेनुसार मला एक स्थळ आलं.शिवणी येथील नावाजलेल्या,लोकप्रिय,सुशिक्षित घराण्यातील खेडेकर परिवारातील मुलीच स्थळ आलं मुलगी नंदुरबार ला शिक्षिका म्हणून नोकरी करत होती तर मी नांदेडला नोकरी करत होतो.शिवणी येथील खेडेकर परिवाराची आबाला चांगली माहिती होती,मोठ्या घराण्यातील व्याही मिळणार होता त्यामुळं आबा खूप खुश होते. शिवणीला आबा नेहमी कामानिमित्त जात होते.खेडेकरांचे पाहुणे बोररांजनीत होते आणि त्या पाहुण्याकडे आबा सालगडी म्हणून काम करत होते.सालगडी असतांना आबा टांगा घेऊन शिवणीला महीना महीना राहत होते कामानिमित्ताने खेडेकरांच वैभव आबांनी स्वतः पाहिलं होते.स्थळ आलं,सोयरीक झाली आणि माझं लग्न ही झालं परंतु आम्ही दोघेही शिक्षण सेवक त्यामुळं दोघांनाही तीन-तीन हजार रुपये पगार होता.

आमचे दोघांचेही शिक्षण सेवक कालावधी पूर्ण झाला आणि आम्हाला फुल पगार सुरू झाला तेंव्हा आबांचे वय होते 78 वर्षे.वयाच्या 78 व्या वर्षी आबांचे शेतात काम करणे कमी झाले. आता आबा स्वतः च्या शेतात काम करू लागले.78 वर्षे वय असूनही आबाला आमच्या दोघांच्या नोकरीमुळे नवा हुरूप आला.2011 ला एक बहिणीचे लग्न आम्ही केले अजून एक बहीण बाकी होती 2012 ला मी आबाला एक एकर जमीन घेऊन दिली त्यावेळी आबांची छाती खूप भरून आली. आबा सर्वांना गर्वाने सांगू लागले मी माझ्या पोराच्या शिक्षणासाठी अर्धा एकर शेती विकली माझ्या पोरानं मला एक एकर शेती घेऊन दिली आणि आबा 80 व्या वर्षीही अजून जोमाने काम करू लागले.2012 मला मुलगी झाली तेंव्हा आबाला खूप आनंद झाला.नात झाल्याचा आनंद आबांच्या चेहऱ्यावर दिसत होता.नातीला सांभाळण्यासाठी आबा सुनबाई सोबत धडगावला राहायला गेले. धडगावला असतांना आबांची तब्बेत छान दिसत होती.2014 ला आम्ही आमच्या सर्वांत लहान बहिणीचं लग्न केले आणि आबा आता म्हणाले,"माझे आता गंगेत घोडे न्हाहले".2014 ला माझी नांदेड हून गावाकडे बदली झाली. 2014 ला मी टू व्हीलर गाडी घेतली आबा आता टु व्हीलर वर बसून शेतात,पाहुण्याच्या गावाला जाऊ लागले. आई आबा बरोबर गावात राहून शाळा करून शेती करू लागलो.आबांच्या मार्गदर्शना खाली मी शेतीचे धडे घेत होतो.

2015 ला पुन्हा मी आबाला दीड एकर शेती घेऊन दिली तेंव्हा सुद्धा आबाला खूप आनंद झाला परंतु आता आबाला शेतात काम होईना झाले.2016 मी जालन्यात प्लॉट घेतला तेंव्हा आबा सर्वांना सांगायचे,"आमची जालन्यात जागा आहे". 2016 ला माझ्या पत्नीची बदली झाली आणि आम्ही सर्वजण आई-आबा, आम्ही दोघे घनसावंगीला रूम करून राहू लागलो.2016 ला मी फोर व्हीलर गाडी घेतली आणि आबा आता फोर व्हीलर गाडी मध्ये बसून फिरू लागले. घनसावंगीत राहून मी आबा सुट्टीच्या दिवशी शेतात काम करू लागलो.2017 ला मला दुसरी मुलगी झाली.आबा आणि आई मुलगी सांभाळत कारण मोठ्या मुलीच्या वेळेस आमची बदली झालेली नव्हती त्यामुळं नातीला सांभाळण्याचा योग त्यांना आला नव्हता.

2019 ला आम्ही जालन्याच्या घरांचे बांधकाम सुरू केले. एक वर्षांत आमचे घर तयार झाले आणि 2020 ला आम्ही जालन्याला राहायला गेलो. वीस बाय वीसच्या मातीच्या घरात राहणारे आबा आता जालन्याच्या "बंगल्यात" राहू लागले. 2020 ला आम्ही शेती बटाईने दिली परंतु आबाला ते काही पटले नाही त्यांनी बटाईची शेती काढून पुन्हा आम्ही घरीच शेती करण्याचा निर्णय घेतला.2020 ला आमच्या लहान मुलीचे अकस्मित निधन झाले तेंव्हा आबाला खूप दुःख झाले.

2021 ला आबाच्या इच्छेनुसार मी गावात जागा घेतली. 2021 ला आबाला कोरोना झाला.आबांचा स्कोर 18 होता डॉक्टरांनी ताबडतोब सरकारी दवाखान्यात ॲडमिट व्हायला सांगितले.आम्ही विचार केला दवाखान्यात ॲडमिट केले तर आबांचे काही खर नाही आपण घरीच उपचार करू आणि 18 चा स्कोर असतांना ही आम्ही आबाला घरीच डॉक्टर च्या मार्गदर्शनाखाली दुरुस्त केले.आबा कोरोनातून पूर्णपणे बरे झाले.2021 ला मी पुन्हा दीड एकर जमीन घेतली.2022 ला आम्ही गावाकडच्या नवीन घेतलेल्या जागेवर बांधकाम करण्याचा निर्णय घेतला आणि आबा साठी गावात "बंगला"बांधला.2022 ला मला मुलगा आणि आबाला नातू झाला तेंव्हा तर आबाला खूपच आनंद झाला परंतु माझ्या पत्नीचे खूप दुखू लागले.माझ्या पत्नीच्या आजारपणाने आबांची तब्बेत खूप खालावली होती.आबांना सुनबाई ची चिंता लागली होती.गावाकडे घराचे काम ही सुरू होते आणि इकडे पत्नीचे दुखणे ही सुरू होते.गावाकडच्या पूर्ण घराला आबांनी पाणी मारले.2023 ला गावाकडच्या घराचे बांधकाम पूर्ण झाले,वास्तू शांती झाली आणि आबांचे दुखणे पुन्हा सुरू झाले.आबा आयसीयू मध्ये ॲडमिट झाले.आबांची तब्बेत खूप खराब झालेली होती परंतु आबांनी या ही वेळेस मृत्यू ला हुलकावणी दिली आणि आबा सुखरूप बरे झाले आणि घरी आले.आबा दुसऱ्यांदा वाचले.2024 ला पुन्हा आबांना दवाखान्यात ॲडमिट करावं लागलं ह्या वेळेस ही आबांनी मृत्यूला हुलकावणी दिली आणि आबा सुखरूप घरी आले.2025 ला पुन्हा आबांची तब्बेत बिघडली आबांना दवाखान्यात ॲडमिट केले पण ह्या वेळेस त्यांच्या तब्बेतीने त्यांना साथ दिली नाही.तब्बल एक महिना ते मृत्यूशी झुंजत राहिले परंतु शरीर आता औषध-पाण्याला साथ देईना. ह्या वेळेस आबा मला म्हणत होते,"भाऊ खूप केलेस माझ्यासाठी पण माझं शरीर आता मला साथ देत नाही तू आता मला दवाखान्यातुन घरी घेऊन चल."

आबांच्या म्हणण्यानुसार मी आबाला गावाकडे घेऊन आलो परंतु आबांचा त्रास मला सहन होईना,त्यांच्या वेदना मला पाहू वाटाणा म्हणून मी आबांची ईच्छा नसतांनाही आबाला परत दवाखान्यात ॲडमिट केले.ॲडमिट करतांना डॉक्टरांनी स्पष्ट सांगितले आता आबांना ॲडमिट करून काहीही फायदा नाही तरी सुद्धा आम्ही विनंती केल्यावर डॉक्टरने आबांना ॲडमिट केले परंतु आबांची तब्बेत काही बरी होईना शेवटी डॉक्टरच्या म्हणण्यानुसार आम्ही आबांना घरी आणले.

दिनांक 7 डिसेंबर2025 ला आबांना घरी आणले.8 डिसेंबर दिवसभर आबा शांत पडून राहिले.रात्री भरपूर जेवण केले आणि 9 डिसेंबर2025 ला सकाळी 5 वाजता आबा आम्हाला सोडून निघून गेले...

हा प्रसंग आमच्या कुटुंबातील सदस्यांसाठी खूपच अवघड होता परंतु ह्या परिस्थिती मला खंबीर राहणं खूप आवश्यक होतं सगळं दुःख पचवून मी माझ्या कुटुंबाला सावरले.आबा लाडाने मला "भाऊ" म्हणायचे. दवाखान्यात ॲडमिट असतांना शेवटच्या दिवशी आबांनी माझ्या डोक्यावरून हात फिरविला, माझ्या मुलांच्या डोक्यावरून हात फिरविला, माझ्या पत्नीच्या डोक्यावरून हात फिरविला आणि भरभरून आशीर्वाद दिला..... आबा तुम्ही दिलेली शिकवण मी आयुष्यभर जतन करीन.तुम्ही माझ्यावर जे संस्कार केलेत ते मी आयुष्यभर जतन करीन.... आमच्या आबांचा मातीच्या घरापासून ते दोन दोन बंगल्या पर्यंतचा प्रवास हा खूपच कष्टाचा आणि स्वप्नवत होता. पायी फिरणारे आबा ते टू व्हीलर,फोर व्हीलर मध्ये फिरणारे आमचे आबा आमच्या साठी खूपच प्रेरणादायी आहेत. सालगडी ते 10 एककर जमिनीचे मालक होणारे आमचे आबा माझ्यासाठी खूपच प्रेरणादायी आहेत.आज आबा नसले तरी त्यांच्या आठवणी, त्यांची शिकवण आणि त्यांच्या कर्तृत्वाचा वारसा माझ्या हृदयात सदैव जिवंत राहील त्यांच्या आयुष्याचे श्रम, त्याग आणि मातीप्रेम मला पुढचा मार्ग दाखवत राहील.

**आबा**
**तुमचाच लाडका**
**बद्रिनारायण यादव(भाऊ)**
**(मुख्याध्यापक)**
**जि.प्र.प्रा.शाळा,शेवगळ**

# शिक्केविना सागवानाचे खोड, लाखोंचा घोटाळा; वनविभाग मौनात

## पोफाळी वनक्षेत्रात सागवान कत्तल प्रकरण; कर्मचारी सहभागाची जोरदार चर्चा”

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड/राजू गायकवाड** : उमरखेड वनपरिक्षेत्रातील पोफाळी वनक्षेत्रात मोठा घोटाळा समोर आला असून तरोडा येथील पावनमारी शिवारातील भूमापन व उपविभाग क्रमांक ६५, भोगरदार सरकार असलेल्या तब्बल २.२१ हेक्टर सरकारी जमिनीवर सागवान जातीच्या मौल्यवान झाडांची मोठ्या प्रमाणावर कत्तल करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. लाखो रुपयांच्या सागवान झाडांची सर्रास कत्तल होऊनही संबंधित वनविभागाने अद्याप कोणतीही ठोस कारवाई न केल्याने संताप व्यक्त केला जात आहे.



या प्रकरणी मधुकर देवाला चव्हाण यांनी वनविभाग व पोलीस स्टेशनला लेखी तक्रार दिली असतानाही आजपर्यंत कुठलीही कारवाई झालेली नाही. यामुळे पोफाळी वनपरिक्षेत्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या भूमिकेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. ही अक्षम्य हलगर्जी आहे की जाणीवपूर्वक केलेली डोळेझाक, असा सवाल परिसरात उपस्थित केला जात आहे. प्रत्यक्ष घटनास्थळी सागवान झाडांची कत्तल करून २५ ते ३० फुटांचे खोड व तुकडे करण्यात आले असून, या खोडांवर कुठलेही अधिकृत शिक्के किंवा नोंदी नसल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. त्यामुळे ही कत्तल कोणाच्या परवानगीने झाली? परवानगी दिलीच असेल तर संबंधित अधिकारी कोण? याची सखोल चौकशी होणार का, असा प्रश्न पर्यावरणप्रेमी व ग्रामस्थ विचारत आहेत.

वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी हे पर्यावरण संरक्षणासाठी असतात की वनसंपत्तीच्या लुटीकडे दुर्लक्ष करण्यासाठी, अशी तीव्र चर्चा सुरू आहे. काही वनविभागातील कर्मचारी या प्रकरणात सामील असल्याचीही चर्चा जोर धरत असून, त्यामुळे प्रकरण अधिक गंभीर बनले आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ दखल घेऊन या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी, दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच कत्तल केलेल्या सागवानाची जब्ती करून नुकसानभरपाई वसूल करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

# ठाणे महानगरपालिकेचा रस्ता घोटाळा उघड

## मनसे विभाग अध्यक्ष शरद पाटील यांनी आयुक्तांकडे केली दोषींवर कारवाईंची मागणी कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत/कल्याण** : ठाणे महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या दिवा आणि मुंब्रा प्रभाग समितीत करोडो रुपयांचा रस्ता घोटाळा करण्यात आल्याचे मनसे विभाग प्रमुख शरद पाटील यांनी केला आहे.या घोटाळ्यात सहभागी असणाऱ्या अधिकारी आणि ठेकेदार यांच्यावर त्वरित कारवाई करण्याची मागणी ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त श्री.सौरभ राव यांच्याकडे पत्राद्वारे करण्यात आली आहे. यामध्ये मनसे विभाग अध्यक्ष शरद पाटील यांचे असे म्हणणे आहे की दिवा प्रभाग समिती आणि मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत येणाऱ्या काही रस्त्यांची कामे झाली नाही आणि या रस्त्यांचे काम झाल्याचे भासवून जवळपास ६७कोटी५७लाख रुपयांचे बिल काढल्याची माहिती मनसे विभाग अध्यक्ष श्री.शरद पाटील यांच्याकडे असल्याचे त्यांनी सांगितले आहे.



बिल पास झाले आहे पण त्या रस्त्यांचे कामच झाले नाही अशा रस्त्यांची यादी पुढील प्रमाणे शरद पाटील यांनी मीडियासमोर दिली आहे.

१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील शीळ दिवा रोड खार्डी जंक्शन ते पडलेगाव पर्यंत ३०मीटर रुंद विकास आराखड्यातील रस्ता रुंदीकरण करणे.

२) मुंब्रा प्रभाग समिती क्षेत्रातील मिनार रेसिडेन्सी ते कल्याण डोंबिवली शिळ रोड पर्यंत डीपी रस्त्याचे डांबरीकरण करणे.

३) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील बी एस यु पी बिल्डींग ते कौसा मार्केट ते स्टेडियम पर्यंतच्या ३०मीटर रस्त्याचे बांधकाम करणे.

४) सेक्टर११ मधील मंजूर विकास योजनेमधील कल्याण फाटा जंक्शन येथील दत्त मंदिराच्या पाठीमागील २५ मीटर डीपी रस्ता व जुना मुंबई पुणे रस्त्याला जोडणाऱ्या३०मीटर डीपी रस्त्याचे बांधकाम करणे.

५) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील कल्याण डोंबिवली मुख्य रस्ता ते डायघर गावातील समशानभूमी आरक्षण भूखंड दोन पर्यंत २५मीटर रुंद रस्त्याचे बांधकाम करणे.

६) डोमखार येथील शीळ दिवा रस्त्यापासून पोलीस स्टेशन आरक्षण क्रमांक एक पर्यंत १२मीटर रस्त्याचे बांधकाम करणे.

# यशोगाथा, लाखाचे उत्पन्न आले हाती, माळ रानावर पिकवली मोसंबीची शेती

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहुर गड ( प्रतिनिधी) सय्यद ईसा** : माहुर तालुक्यातील शेख फरीद वझरा येथील शेतकरी यांच्याशी संवाद साधला असता मराठी म्हणी गत आम्ही कृषीचे वारकरी शेती आमची पंढरी, बळीराजा आमुचा पांडुरंग तोची जगाला उध्दारी. निवळ खडकाळ रानावर सय्यद जाफर सय्यद इब्राहिम ह्या शेतकऱ्यांनी मोसंबीची सहासे झाडे आपल्या शेतात लावली त्या मध्ये त्यांनी आंतरपीक फुलांची झाडे व भाजीपाला उत्तमरीत्या ठिबक सिंचन लावून ते करीत आहेत एकीकडे शेतकरी आत्महत्या करत आहेत तर दुसरीकडे अस्मानी संकटाला सामोरे जावुन एक आदर्श शेतकरी होण्याचा बहुमान मिळवत आहेत. त्यांचेच हे एक उत्तम उदाहरण आहे. मेहनत, जिद्द, आणि परीश्रम करून डोंगर कपारीत शेती करणारा हा बळीराजा आपली शेती उत्तमरित्या करीत आहे.

दोन मुले व एक मुलगी असा छोटासा परिवार आहे. शेतीच्याच सहा-याने मुलांना चांगल्या प्रकरचे शिक्षण देवून मुलांना शिक्षणाबरोबर व्यवसायाची जोड दिली. तर मुले 'योग्य व्यवसाय



करून आपली शेती वडीलांच्या खांद्याला खांदा लावून करीत असल्यामुळे सय्यद जाफर सय्यद इब्राहिम या अल्पसंख्याक शेतक-याने तुटपुंज्या शेतीच्या उत्पन्नाचे भरवशावर मुला मुलीत भेदभाव न करता मुलीला वैद्यकीय क्षेत्रातील उच्च शिक्षण देवून डॉक्टर केले आहे. तेव्हा निसर्गाचे प्रकोपावर न रडत बसता वझरा शे. येथिल अल्पभूधारक शेतकरी सय्यद जाफर सय्यद इब्राहिम या शेतकऱ्यांने एक आदर्श निर्माण केला आहे हे सत्य.

# दैनिक युवक आधार'च्या बातमीचा परिणाम

## डोळंबा ग्रामपंचायतीला जाग! दुषित पाण्याच्या समस्येवर अखेर उपाययोजना

**दैनिक युवक आधार**

**उमेश साखरकर/दिग्रस प्रतिनिधी** : 'दैनिक युवक आधार'ने प्रकाशित केलेल्या बातमीमुळे डोळंबा येथील नागरिकांना अनेक दिवसांपासून भेडसावणाऱ्या दुषित पाण्याच्या समस्येवर अखेर ग्रामपंचायतीला जाग आली आहे. बातमी प्रकाशित होताच तातडीने ग्रामपंचायत पाणीपुरवठा योजनेच्या फुटलेल्या पाईपलाईन दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे.

गावातील पाणीपुरवठा योजनेची मुख्य पाईपलाईन अनेक ठिकाणी फुटली होती. या फुटलेल्या पाईपलाईनमधून गटाराचे पाणी आणि अन्य दूषित पदार्थ मिसळून पिण्याचे पाणी दूषित होत होते. यामुळे गावातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले होते. नागरिकांनी



### डोळंबा येथे ग्रामपंचायत पाणीपुरवठा पाईपलाईन फुटल्याने नागरिक त्रस्त

दैनिक युवक आधार

उमेश साखरकर दिग्रस प्रतिनिधी

डोळंबा येथील नागरिकांना गेले अनेक दिवस दूषित पाण्याचा सामना करावा लागत आहे. ग्रामपंचायतच्या पाणीपुरवठा योजनेची पाईपलाईन अनेक ठिकाणी फुटून आहे ,

मिळालेल्या माहितीनुसार, डोळंबा गावातील मुख्य पाणीपुरवठा पाईपलाईन अनेक जुनी आणि खराब झाली आहे. परिणामी, ही पाईपलाईन विविध ठिकाणी फुटून पाण्याची गळती होत आहे. या गळतीमुळे पिण्याच्या पाण्यात परिसरातील सांडपाणी व इतर दूषित घटक मिसळत आहेत, ज्यामुळे नागरिकांना अत्यंत अशुद्ध व दूषित पाणी मिळत आहे.या दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे. अनेकांना पोटाचे विकार, जुलाब, आणि इतर जलजन्य आजारांचा त्रास होऊ लागला आहे. विशेषतः लहान मुले आणि वयोवृद्ध नागरिक यांच्या आरोग्यावर याचा वाईट परिणाम होत आहे.

गावातीलनागरिकसातत्यानेग्रामपंचायतकडे या पाईपलाईनच्या दुरुस्तीची किंवा आवश्यक असल्यास नवीन पाईपलाईन टाकण्याची मागणी करत आहेत. "अनेक दिवसांपासून आम्ही दूषित पाणी पीत आहोत. याबाबत वारंवार तक्रारी करूनही ग्रामपंचायतकडून कोणतीही ठोस कार्यवाही होताना दिसत नाही," अशी तक्रार अनेक स्थानिक नागरिकानी केली आहे. या गंभीर समस्येकडे ग्रामपंचायतने त्वरित लक्ष देण्याची गरज आहे. पाईपलाईनची तातडीने दुरुस्ती करणे, दूषित पाणीपुरवठा थांबवणे आणि नागरिकांना शुद्ध पाणी उपलब्ध करून देणे हे अत्यावश्यक आहे. अन्यथा, डोळंबा गावामध्ये जलजन्य आजारांची साथ पसरण्याची भीती आहे.

सद्या ग्रामपंचायत वर प्रशासक मस्के साहेब व ग्रामपंचायत अधिकारी डेरे साहेब यांच्या कडे डोळंबा गावाचा कारभार आहे. दिग्रस वरूनच गावाचा कारभार चालवत असल्यामुळे यांचे गावाकडे अजिबात लक्ष नसल्याचा आरोप गावकरी करत आहे

वारंवार सांगून ही ग्रामपंचायतीकडून या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष केले जात होते.गावकऱ्यांची ही समस्या लक्षात



घेऊन 'दैनिक युवक आधार' वृत्तपत्राने नुकतीच या विषयावर सविस्तर बातमी प्रकाशित केली. या बातमीत डोळंबा येथील नागरिकांना होणारा त्रास आणि ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षावर बोट ठेवण्यात आले होते.

**बातमीमुळे ग्रामपंचायतीला जाग**

'दैनिक युवक आधार'मध्ये बातमी प्रकाशित होताच, या प्रकरणी ग्रामपंचायतीची प्रशासकीय यंत्रणा खडबडून जागी झाली. नागरिकांच्या तीव्र भावना आणि आरोग्यविषयक धोक्याची दखल घेत ग्रामपंचायतीने कोणताही वेळ न दवडता, तात्काळ फुटलेल्या पाईपलाईनच्या दुरुस्तीचे काम सुरू केले आहे.या कामामुळे लवकरच नागरिकांना शुद्ध आणि स्वच्छ पाण्याचा पुरवठा होण्यास मदत मिळेल, अशी आशा व्यक्त होत आहे.

# स्त्री शक्ती फाउंडेशनतर्फे मोफत महाआरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी** : स्त्री शक्ती फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य आणि एम.जी. एम. वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य 'महाआरोग्य शिबीर' मंगळवार दिनांक १६ डिसेंबर २०२५ बुधवार – १७ डिसेंबर २०२५ यादिवशी सकाळी १०.०० ते दुपारी २.०० यावेळेत समाज मंदिर, कळंबोली प्लॉट क्र. १, सेक्टर – ५ E येथे आयोजित करण्यात आले आहे.

मोफत आरोग्य तपासणीसह, सरकारच्या महत्वाच्या खालील योजना मोफत कार्डासह उपलब्ध: महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजना हे याशिबिराचे वैशिट्य असून




याशिबिरांतर्गत सर्वसाधारण आरोग्य तपासणी, बालरोग तपासणी, कान–नाक–घसा तपासणी, त्वचारोग तपासणी, स्त्रीरोग तपासणी, डोळ्यांची तपासणी, हाडांच्या व्याधी तपासणी, दंत चिकित्सा यासारख्या तपासण्या होणार आहेत. शिबिरात सहभागी होताना आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत सदर शिबिरास आमदार मा. श्री. प्रशांतदादा ठाकूर साहेब, मा. श्री. परेशशेठ ठाकूर – माजी सभागृह नेते, मा. श्री. अविनाशजी कोळी – जिल्हाध्यक्ष, उत्तर रायगड भाजपा, मा. अमर अरुण पाटील – अध्यक्ष, कळंबोली शहर मंडल, मा. सौ. प्रिया बबन मुकादम – जिल्हाध्यक्ष, महिला मोर्चा, मा. सौ. मोनिका प्रकाश महानवर – अध्यक्ष, महिला मोर्चा, कळंबोली शहर मंडल यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून या शिबिराचे आयोजन सौ. विजया चंद्रकांत कदम संस्थापक अध्यक्ष – स्त्री शक्ती फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य यांनी केले असून नागरिकांनी या भव्य आरोग्य उपक्रमाचा लाभ घ्यावा व आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी असे आवाहन विजया चंद्रकांत कदम यांनी केले आहे.

# भटके श्वान नियंत्रण कार्यक्रमांतर्गत पंचायत समिती पनवेल येथे सभा

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : डिसेंबर रोजी भटके श्वान नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त रायगड डॉ. सचिन देशपांडे यांच्या दिलेल्या सूचनेनुसार गटविकास अधिकारी पनवेल समीर वाठारकर व सहाय्यक आयुक्त ता.ल. पं. स. चि. पनवेल डॉ. समीर तोडणकर यांच्या मार्गदर्शनाखाली पंचायत समिती पनवेल येथे सभा घेण्यात आली. या सभेमध्ये भटके श्वान नियंत्रण कार्यक्रमात अंतर्गत सुप्रीम कोर्ट यांच्या आदेशाची, नगर विकास विभाग यांचे परिपत्रक, ग्रामविकास विभाग यांच्या परिपत्रक तसेच एडब्ल्यूबीआय मार्फत जारी झालेल्या एसओपी पत्रकाचे सविस्तर वाचन करून माहिती सर्व ग्राम विकास अधिकारी यांना प्रत्यक्षात देण्यात आली व तसेच



ग्रामपंचायत पातळीवर भटके श्वान नियंत्रण कमिटी स्थापन करण्याच्या सविस्तर सूचना व मार्गदर्शनवरील सर्व परिपत्रकाचे वाचन करून डॉ. आनंद मारकवार पशुधन विकास अधिकारी विस्तार पंचायत समिती पनवेल यांनी सर्व उपस्थित ग्रामविकास अधिकारी यांना मार्गदर्शन केले. या सभेस मा. सहा. गट विकास अधिकारी आर बी कोलटक्के, संतोष ठोंबरे विस्तार अधिकारी पनवेल, महेश घबाडी विस्तारा अधिकारी पनवेल, सागर पाटील कनिष्ठ प्रशासन अधिकारी पंचायत समिती पनवेल उपस्थित होते.

# लोकनियुक्त सरपंच माननीय अमोल पाटील यांना आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर** : पाचुंब्री तालुका शिराळा येथील लोकनियुक्त युवा सरपंच माननीय अमोल पाटील यांना कराड तालुका कुस्ती संघ कला क्रीडा सांस्कृतिक ट्रस्ट यांच्या संकल्पनेतून १५ नोव्हेंबर २०२५ रोजी कुशल कुस्ती संघटक पै. तानाजी चवरे (आप्पा) वाढदिवस उत्सव समिती यांच्यावतीने आदर्श सरपंच पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.अमोल पाटील यांना राजकीय ,सामाजिक व शैक्षणिक क्षेत्राची आवड असल्यामुळे पहिल्या पाच वर्ष गावचे उपसरपंच पदभार सांभाळताना अहोरात्र गावच्या विकासासाठी काम केले. गावच्या नागरिकांनी पुढील पाच वर्षासाठी पाचुंब्री गावचे लोकनियुक्त सरपंच पदासाठी निवडून दिले. गावातील नागरिकांनी दिलेल्या संधीचे सोने करून पाचुंब्री



गावचा सर्वांगीण विकास करून शिराळा तालुक्यात नावलौकिक वाढवण्याचे काम केले. सर्वांगीण गावच्या विकासाच्या कामामुळे कराड तालुका कुस्ती संघ कला क्रिडा सांस्कृतिक ट्रस्ट महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतून अमोल पाटील यांना आदर्श सरपंच म्हणून सन्मानित करण्यात आले .पाचुंब्री गावातील व शिराळा तालुक्यातील मार्गदर्शक,हितचिंतक, मित्रपरिवार यांनी अमोल पाटील यांचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

# 'समृद्धी'चा महामार्ग मोकळा! पालोद ग्रामपंचायतीचा ऐतिहासिक निर्णय; घरपट्टी-पाणीपट्टीत ५०% सूट; प्रशासनासाठी 'आदर्श' कृती

**दैनिक युवक आधार**

**सिल्लोड (योगेश पालोदकर)** : पालोद ग्रामपंचायतीच्या हद्दीतील मालमत्ताधारक नागरिकांना थकीत करांमध्ये ५० टक्क्यांची मोठी सवलत देण्याचा ऐतिहासिक निर्णय पालोद ग्रामपंचायतीने घेतला आहे. 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' अंतर्गत, घरपट्टी, दिवाबत्ती कर, आरोग्य कर आणि पाणीपट्टी करांच्या थकबाकीवर ही 'सुवर्णसंधी' उपलब्ध करून देण्यात आली असून, याचा लाभ घेण्यासाठी येत्या ३१ डिसेंबर २०२५ पर्यंतची अंतिम मुदत देण्यात आली आहे.

ग्रामपंचायतीच्या हद्दीतील ज्या निवासी मालमत्ताधारकांनी सन २०२५-२६ या चालू वर्षाच्या आधीची म्हणजेच ०१ एप्रिल, २०२५ पूर्वीची घरपट्टी, दिवाबत्ती कर, आरोग्य कर आणि पाणीपट्टी करांची एकूण थकबाकी एकाच वेळी ग्रामपंचायतीकडे जमा केल्यास, त्यांना थकबाकीच्या ५०% रकमेची सवलत मिळणार आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे अनेक वर्षांची थकीत कर रक्कम भरण्यास नागरिक पुढे येतील आणि ग्रामपंचायतीच्या महसुलात वाढ होऊन विकासाच्या कामांना




गती मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.सरपंच, उपसरपंच, सर्व सन्माननीय सदस्य-सदस्या आणि ग्रामविकास अधिकारी, ग्राम पंचायत, पालोद यांनी संयुक्तपणे नागरिकांना आवाहन केले आहे की, त्यांनी या योजनेचा लाभ घेऊन ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी एक रकमी रक्कम भरून पालोद ग्रामपंचायतीच्या 'समृद्ध पंचायत राज अभियान' या उपक्रमात सहकार्य करावे. ग्रामपंचायतीच्या या स्तुत्य उपक्रमामुळे अनेक नागरिकांना दिलासा मिळाला असून, पालोद गाव विकासाच्या दिशेने वेगाने वाटचाल करेल, अशी अपेक्षा आहे.

# आई सोमजाई देवी सप्ताह व भव्य रथयात्रा : श्रद्धा, परंपरा आणि भक्तीचा महासागर श्रीवर्धनमध्ये उसळला

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन (अनिकेत मोहित)** : नवसाला पावणारी, संकटाला धावून येणारी आणि संपूर्ण गावाचे रक्षण करणारी अशी जनमानसात अढळ श्रद्धा असलेल्या आई सोमजाई देवीचा सप्ताह व रथयात्रा उत्सव आज अत्यंत भक्तिमय, उत्साही आणि ऐतिहासिक वातावरणात संपन्न झाला. या उत्सवानिमित्त श्रीवर्धन नगरीत श्रद्धा, परंपरा आणि भक्तीचा जणू महासागर उसळल्याचे



दृश्य पाहायला मिळाले.दिनांक १२ नोव्हेंबर रोजी दुपारी आयोजित करण्यात आलेल्या महाप्रसादाला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. गावकरी, महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच दूर-दूरहून आलेल्या भक्तांनी आई माऊलीच्या चरणी नतमस्तक होत महाप्रसादाचा लाभ घेतला.रात्री ठीक १२ वाजता पारंपरिक विधी, मंत्रोच्चार आणि ढोल-ताशांच्या गजरात भव्य रथयात्रेला प्रारंभ झाला. "आई माऊलीचा उदो उदो", "जय सोमजाई माऊली" या जयघोषांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. दिव्यांच्या प्रकाशात सजलेला रथ, भक्तांची गर्दी आणि भक्तीभावाने न्हालेलं वातावरण पाहून अनेक भाविक भारावून गेले. आई सोमजाई देवी ही केवळ श्रद्धेचे केंद्र नसून, संकटसमयी धावून येणारी रक्षणकर्ती म्हणून ओळखली जाते. त्यामुळेच या उत्सवाला श्रीवर्धनसह तालुक्यातील व जिल्ह्यातील विविध भागातून भाविक मोठ्या संख्येने दाखल होतात. शांतता, शिस्त आणि भक्तिभाव यांचे दर्शन घडवत हा उत्सव यशस्वीरीत्या पार पडला.

# लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंती निमित्त आमदार अब्दुल सत्तार यांचे अभिवादन!

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड** : लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त सिल्लोड शहरात त्यांना आदराने अभिवादन करण्यात आले. सिल्लोड येथील समता नगर भागातील रहिवासी श्री. हरिदास ताठे यांच्या निवासस्थानी आयोजित करण्यात आलेल्या अभिवादन कार्यक्रमास आमदार अब्दुल



सत्तार यांनी प्रमुख उपस्थिती लावली होती.यावेळी आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. उपस्थितांशी संवाद साधताना आमदार अब्दुल सत्तार यांनी स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रेरणादायी जीवनकार्यास आणि त्यांनी समाजासाठी दिलेल्या योगदानाला उजाळा दिला. या कार्यक्रमाला कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विश्वास दाभाडे, हरिदास ताठे, संचालक सतीश ताठे, नॅशनल सूतगिरणीचे व्हाईस चेअरमन नरेंद्र पाटील, संचालक विठ्ठल सपकाळ, शंकरराव खांडवे, विशाल जाधव, मारुती वराडे, सचिन पाखरे, सिद्धेश्वर आहेर, फहिम पठाण, सुखदेव जाधव, अतिष ताठे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# मेहता हॉस्पिटल बारामती व छत्रपती कारखान्याच्या संयुक्तपणे मोफत आरोग्य शिबीर

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील भवानीनगर येथे श्री छत्रपती सह साखर कारखाना आणि मेहता मेडिकअर हॉस्पिटल बारामती यांच्या संयुक्त विध्यमाने दि 12 डिसेंबर रोजी कारखान्याच्या श्री छत्रपती रुग्णालय येथे करण्यात आले होते.या मोफत आरोग्य शिबीराचे उदघाटन श्री



छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे संचालक डॉ.योगेश पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले यावेळी छत्रपती सह साखर कारखान्याचे चेअरमन पृथ्वीराज जाचक व्हा. चेअरमन कैलास गावडे संचालक शिवाजीराव निंबाळकर,अनिल काटे, अजित पाटील,सौ सुचिता सपकळ,अशोक पाटील,सतीश देवकाते सर्व संचालक मंडळ श्री मेहता हॉस्पीटल बारामती व भवानीनगर-सणसर परिसरातील डॉक्टर उपस्थित होते. मोफत आरोग्य शिबीर व मोफत ऑपरेशन सुविधा अश्या अनेक आजारावर शेकडो रुग्णांची तपासणी करून लाभ घेतला मोफत रक्त तपासणे औषध उपचार केले असून रुग्णाच्या शत्रक्रिया सुद्धा मोफत होणार असल्याची माहिती मेहता हॉस्पिटल बारामती चे विशाल मेहता यांनी सांगितलं.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## थोडक्यात

### भवानीनगर येथील गोविंदराव पवार विद्यालयात क्रीडा महोत्सवाचे आयोजन



**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय** : गोविंदराव पवार विद्यालय व जुनिअर कॉलेज भवानीनगर येथे मा.शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या 85 व्या वाढदिवसानिमित्त तीन दिवशीय वार्षिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये विद्यालयातील सर्व मुले व मुलींनी कब्बडी खो खो व्होलीबॉल तसेच वैयक्तिक व सांघिक खेळामध्ये भाग घेतला होता.दि.11 डिसेंबर ते 13 डिसेंबर या काळात या वार्षिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष प्रा.सिद्धेश्वर फुले सचिव सौ रंजना फुले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असल्याची माहिती जाधव सर यांनी दिली.वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उदघाटन गोविंदराव पवार विद्यालयाचे मुख्याध्यापक गोरे हनुमंत आनंदा यांच्या शुभहस्ते करण्यात आले असून यावेळी सर्व विध्यार्थी शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी पालक वर्ग उपस्थित होते सर्वांच्या सहकार्यान क्रीडा स्पर्धा व्यवस्थित पार पाडण्यात आल्या.

### दीप ऑफसेट प्रिंटर्स चे मालक तथा दें.वाशिम भाग्यविधाता पेपरचे संपादक मा. प्रदीप सालवणकर वारा जहा वाशिम यांची जिल्हा बहुउद्देशीय कामगार संघटना महाराष्ट्र सचिव पदी निवड



**दैनिक युवक आधार**

**वाशिम/गजानन पवार पाटील** : राज्य संस्थापक अध्यक्ष कामगार नेते मा. नामदेव भीमराव घोरपडे यांच्या मार्गदर्शनात असलेली असंघटित संघटित कामगाराच्या न्याय हक्कासाठी संघर्ष करीत असलेली तसेच गोरगरीब दिन दुबळ्या लोकांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढा देण्यासाठी कार्यरत असलेल्या बहुउद्देशीय कामगार संघटनेच्या शाखा वाशिमच्या जिल्हा सचिव पदी प्रिंटर्स चे मालक तथा दे. भाग्यविधाता पेपरचे संपादक मा.प्रदीप रामदास सालवणकर. त्यांची निवड करण्यात आली आहे.

### उमरी गांव तलाव प्रशासनाच्या दुर्लक्षतेमुळे दारुड्याचा अड्डा घाणीचे साम्राज्य



**दैनिक युवक आधार**

**उमरी/रूपेशकुमार श्रीरामवार** : उमरी येथे शहराच्या मध्यवर्ती भागत निजाम कालीन गांव तलाव आहे. गांव तलावाच्या सुशोभिकरणासाठी मोठया प्रमाणात प्रशासकीय स्तरावरून निधी आण्यात आला. त्या माध्यमातुन गांव तलावाचे सुशोभिकरण करण्यात आले आसून वॉकिंग ट्रॅक, सायकल ट्रॅक, गार्डन तयार करण्यात आला आहे. या तलवाच्या काठावर सकाळी व सायंकाळी शहरातील नागरीक या ठिकानी योगासण व्यायाम करण्यास येते आहेत.या ठिकानी बरेच दिवसा पासून प्रशाशनाच्या हलगर्जी पणामुळे दारुड्यांचा मुक्त संचार होत असून जनु हा तलाव दारुड्यांचा अड्डा झाल्याचे निदर्शनास येत आहे. जागो-जागी दारूच्या बाटल्याचा खच, प्लॅस्टिक बॉटल ,कॅरीबॅग कैर कचरा दिसून येत असुन दारुड्या मुळे महिला वर्ग मध्ये भीतीचे वातावर पसरत आहे. प्रशासनाने याकडे विशेष लक्ष देऊन दारुड्यांचा योग्य तो बंदोबस्त करावा तलावावर स्वच्छता ठेवावी व याठिकाणी पूर्ण वेळ सुरक्षारक्षक देखरेखीसाठी ठेवण्यात यावे असे शहरातील नागरिकांची मागणी होत आहे.

### जिल्हा परिषद शाळा लोणीचे एक पऊल प्रगतीच्या दिशेने..



**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर** : मुंबई येथे होणाऱ्या किशोर किशोरी राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो खो स्पर्धेसाठी जि. प. लोणी बु. शाळेतील चि. ज्ञानेश्वर धर्मे व आरूष धर्मे या दोघांची राज्य स्पर्धेसाठी परभणी जिल्हा खो खो संघात निवड झाल्याबद्दल त्यांचे व त्यांचे प्रशिक्षक श्री महेंद्र*नाना धर्मे यांचे हार्दिक अभिनंदन. तसेच विज्ञान प्रदर्शन – तालुकास्तरीय प्रथम क्रमांक) विज्ञान प्रदर्शनात तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळवून तुम्ही शाळेचा मान अभिमानाने उंचावला आहे. तुमची मेहनत, जिज्ञासा आणि उत्कृष्ट सादरीकरण यांचे खरे फलित या यशातून दिसून येते.या उज्ज्वल कामगिरीबद्दल हार्दिक अभिनंदन!तुमच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा. सतत प्रगती करत रहा आणि नवे शोध घेण्याची प्रेरणा कायम ठेवा. **शुभेच्छुक :** ( मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समिती जिल्हा परिषद लोणी आदर्श शाळा)

# "केवळ पालकांची इच्छा नव्हे, तर तुमची 'महत्त्वाकांक्षा'च घडवेल भविष्य"

## एपीआय रवींद्र ठाकरेंनी उलगडले विद्यार्थिनींच्या यशाचे गुपित

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर (सिल्लोड)** :- ग्रामीण भागातील मुलींना संधीची कमतरता नाही, मात्र त्या संधीचे सोन्यात रूपांतर करण्यासाठी केवळ आई-वडिलांचा हट्ट पुरेसा नसतो; त्यासाठी स्वतःच्या मनातील ध्येयाची ठिणगी पेटणे आवश्यक असते. "परिस्थिती कोणतीही असो, क्षमतावृद्धी आणि निश्चित दिशाच तुम्हाला यशाच्या शिखरावर पोहोचवू शकते," असा आत्मविश्वासाचा आणि यशाचा मूलमंत्र सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र ठाकरे यांनी दिला. सिल्लोड तालुक्यातील माणिकनगर येथील श्री सिद्धिविनायक मुलींच्या वसतिगृहात विद्यार्थिनींशी संवाद साधताना ते



बोलत होते.

सध्याच्या स्पर्धात्मक युगात केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणे पुरेसे नसून, व्यक्तिमत्त्वाला शिस्तीची जोड देणे गरजेचे आहे, हे अधोरेखित करताना एपीआय ठाकरे यांनी विद्यार्थिनींच्या मनातील भीती दूर केली. ते म्हणाले, "उपलब्ध सोयीसुविधा या केवळ साधने आहेत, साध्य नव्हे. जर तुमची इच्छाशक्ती प्रबळ असेल, तर कोणत्याही क्षेत्रात तुम्ही स्वतःचा ठसा उमटवू शकता. स्वतःच्या क्षमता ओळखा आणि त्यानुसार अभ्यासाचे टप्पे पार करा." विशेष म्हणजे, हा केवळ एकपात्री उपदेश ठरला नाही, तर एका मुक्त संवादात याचे रूपांतर झाले. यावेळी विद्यार्थिनींनी स्पर्धा परीक्षांमधील आव्हाने आणि करिअरच्या वाटांबद्दल विचारलेल्या प्रश्नांना ठाकरे यांनी अत्यंत मार्मिक आणि प्रेरणादायी उत्तरे दिली, ज्यामुळे उपस्थितांमध्ये एक नवा उत्साह संचारला.

या दौऱ्यादरम्यान, पोलीस प्रशासनाच्या वतीने विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा आढावा देखील घेण्यात आला. एपीआय ठाकरे यांनी वसतिगृहातील शिस्तबद्ध वातावरण, अद्ययावत सोयीसुविधा आणि सुरक्षिततेच्या उपाययोजनांची बारकाईने पाहणी केली. येथील व्यवस्थापन पाहून त्यांनी, "ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणासाठी आणि सुरक्षिततेसाठी असे भक्कम व्यासपीठ उपलब्ध असणे कौतुकास्पद आहे," अशा शब्दांत संस्थाचालकांचे आणि प्रशासनाचे विशेष अभिनंदन केले.

या प्रेरणादायी सोहळ्यासाठी संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती कलावती बोराडे, उपाध्यक्ष संतोष बोराडे आणि सचिव सुनील बोराडे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच, वसतिगृह अधीक्षिका मनीषा बिडवे, विद्या छडीदार यांच्यासह पोलीस कर्मचारी दीपक पाटील, पंडित फुले, भिकन सतुके आणि वसतिगृहातील २४ निवासी विद्यार्थिनी उपस्थित होत्या. या कार्यक्रमामुळे विद्यार्थिनींना केवळ सुरक्षिततेची हमीच मिळाली नाही, तर भविष्यातील आव्हाने पेलण्यासाठी एक नवी उमेदही मिळाली.

## राज्यातील सफाई कामगारांसाठी आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे** : राज्यातील महानगरपालिका मध्ये सफाई कामगारांना हक्काची घरे मिळावी, आरोग्य सुविधा, शैक्षणिक सुविधांसह इतर उपाययोजना करण्यात याव्यात या मागणीसाठी म्युनिसिपल मजदुर युनियन चे अध्यक्ष अशोक जाधव यांच्या नेतृत्वाखाली नागपूर हिवाळी अधिवेशनात सरकारचे लक्ष वेधण्यासाठी धरणे आंदोलन सुरू करण्यात आहे. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे



यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह धरणे मंडपात आंदोलनकर्त्यांची भेट घेतली.सफाई कामगाराच्या या आंदोलनात तन, मन, धन असा पाठिंबा बागडे यांनी जाहीर केला. या प्रसंगी राजु दादा पांजरे, प्रा.रमेश दुपारे, प्रविण आवळे, पुण्यशील बोदिले, अजय मुन सह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. बागडे यांनी सफाई कामगारांचे आयुष्य खूप जवळून पाहिले आहे.

राज्यात कुठेही सफाई कामगारांवर अन्याय अत्याचार व सफाई कामगारांचे प्रश्न घेऊन कुठे आंदोलन सुरू असेल तिथे बागडे आपल्या कार्यकर्त्यांसह सहभाग घेत आंदोलनाला पाठिंबा देत असतात.

## सेलू उपजिल्हा रुग्णालयातील दिव्यांगांची हेळसांड; दिव्यांग हक्क मोर्चाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी/शिवाजी पवार** : सेलू उपजिल्हा रुग्णालयात दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या गुरुवारी दिव्यांग बांधवांना दिव्यांग प्रमाणपत्र व युडीआयडी कार्डसाठी तपासणी केली जाते. मात्र, दिनांक ११ डिसेंबर रोजी झालेल्या तपासणीदरम्यान दिव्यांगांची मोठ्या प्रमाणावर हेळसांड झाल्याचा आरोप दिव्यांग हक्क मोर्चा संघटनेने केला आहे.या दिवशी तपासणीसाठी आलेले डॉक्टर खाजा शेख यांनी उपस्थित ७० ते ७५ दिव्यांगांपैकी सुमारे ३० ते ३५ दिव्यांग बांधव नियमात बसत असतानाही त्यांना पुढील तपासणीसाठी परभणीला जाण्याचे निर्देश दिले. मात्र, संबंधित दिव्यांग बांधव परभणी येथे गेल्यानंतर तेथील डॉक्टरांनी "तुमची तपासणी सेलू उपजिल्हा रुग्णालयातच होणार आहे" असे सांगितल्याने दिव्यांग बांधवांची मोठी गैरसोय व मानसिक त्रास झाला आहे.या परस्परविरोधी सूचनांमुळे सेलू तालुक्यातील दिव्यांगांना आर्थिक,



शारीरिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असून प्रशासनाच्या निष्काळजीपणाबद्दल नाराजी व्यक्त होत आहे.या प्रकरणात जिल्ह्याच्या पालकमंत्री सौ. मेघना दीदी साकोरे बोर्डीकर, खासदार संजयजी जाधव, जिल्हा रुग्णालय परभणी तसेच संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष घालून संबंधित डॉक्टरांच्या टीमला स्पष्ट सूचना द्याव्यात, अशी मागणी दिव्यांग हक्क मोर्चा संघटनेचे जिल्हाध्यक्ष गुलाबराव पाटील खेडेकर यांनी केली आहे.वेळीच दखल न घेतल्यास दिव्यांग हक्क मोर्चा संघटनेच्या वतीने परभणी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लेखी निवेदन देऊन उपोषण करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

## सुमनबाई भरतसिंह परिहार यांचे निधन

**दैनिक युवक आधार**

**जफराबाद प्रतिनिधि/ दिनकर जंजाळ** : प्रहार दिव्यांग क्रांति संघटना जलाना जिल्हा उपध्यक्ष भरतसिंह परिहार यांच्या पत्नी वय वर्ष 67 सुमनबाई परिहार यांचे अल्पशा आजराने दी.10/12/2025रोज बुधवारला 6.30वाजता दुःखद निधन झाले तरी त्यांचा पशात दोन मुलं दोन मुली भाऊ बावजय व नातवंड असा मोठा परिवार आहे शोकाकुल . पती.भरतासिह अमरसिंग परिहार मुलगा भरतसिंह परिहार मुलगा प्रकाश परिहार तसेच परिहार परिवार कोनड भावपूर्ण श्रद्धांजलि



## रस्त्यात गाडी अडवून लूटप्रकरणी एकास तीन वर्षे सश्रम कारावास; दुसरा निर्दोष

**दैनिक युवक आधार**

**निफाड (राजेश भडांगे)** : निफाड तालुक्यातील चाटोरी शिवारात गाडी अडवून चालकाच्या खिशातून ४० हजार रुपयांची लूट केल्याप्रकरणी निफाडचे जिल्हा सत्र न्यायाधीश अब्दुस्सलाम अश्पाक अहमद शेख यांनी एका आरोपीस तीन वर्षे सश्रम कारावास व ५० हजार रुपयांचा दंडाची शिक्षा सुनावली असून दुसऱ्या आरोपीस निर्दोष मुक्त केले आहे.याबाबत, निफाड पोलीस ठाण्यात नईमुद्दीन सय्यद यांनी दि.१५ सप्टें २०१२ रोजी दिलेल्या फिर्यादित म्हटले आहे की, व्यापारी राकेश कुमार व रवी कुमार सिंग यांच्याकडून प्रत्येकी २० हजार रुपये असे एकूण ४० हजार रुपये घेऊन ते कारने चाटोरी येथे आले होते. दुपारी सुमारे २ वाजता त्यांच्या कारला ओव्हरटेक करून एक मोटारसायकल आडवी उभी करण्यात आली. त्या मोटारसायकलवर दशरथ ऊर्फ गोट्या लहाने व योगेश जेजुरकर हे दोघे होते. यावेळी गोट्या लहाने याने मारहाण करून खिशातील ४० हजार रुपये बळजबरीने काढून घेतले. त्यांचे फिर्यादीवरून निफाड पोलिसांनी भादंवि कलम ३९४, ३९७, ३४१, ४२७, ३४ अन्वये गुन्हा नोंदवून तपासाअंती आरोपपत्र न्यायालयात सादर केले. सरकार पक्षातर्फे सहा.जिल्हा सरकारी वकील रमेश कापसे यांनी तपास अधिकारी जी.एन.चौधरी यांच्यासह एकूण आठ साक्षीदारांच्या साक्षी नोंदवून प्रभावी युक्तिवाद केला. कोर्ट पैरवी म्हणून म.पो.कल्पना पवार यांनी कामकाज पाहिले. न्यायालयासमोर आलेल्या पुराव्यांवरून दशरथ ऊर्फ गोट्या लहाने यांस दोषी ठरवून भा.दं.वि कलम ३४१ अन्वये एक वर्ष सश्रम कारावास व प्रत्येकी ५०० रुपये दंड (दंड न भरल्यास ७ दिवस साधा कारावास) तसेच भा.दं.वि कलम ३९२ अन्वये तीन वर्षे सश्रम कारावास व ५०,००० रुपये दंड (दंड न भरल्यास ४ महिने साधा कारावास) अशी शिक्षा सुनावण्यात आली. तर योगेश जेजुरकर यास निर्दोष मुक्त करण्यात आले.

## ठाण्याची रणरागिणी समृध्दीची भारतीय वायू तज्ञदलात फ्लाईग अधिकारी पदी निवड

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत/ कल्याण :** जिद्द, तपश्चर्या आणि उघड्या डोळ्यांनी पाहिलेल्या स्वप्नांच्या जोरावर आकाशालाही आपल्या उंबरठ्यावर आणणाऱ्या पारसिक नगर कळवा ठाणे येथे राहणाऱ्या कुमारी समृद्धी अजित वामन हिची भारतीय वायु तज्ञदलात फ्लाइंग ऑफिसर म्हणून नुकतीच १२ डिसेंबर रोजी निवड झाली.

समृध्दी ची निवड कुटुंबासाठी, गावासाठी, ठाणेकरासाठी आणि समाजासाठी एक अविस्मरणीय गौरवाचा क्षण आहे.तिच्या या निवडीबद्दल तिचे विविध स्तरातून कौतुकाचा वर्षाव सुरू आहे.

समृध्दी ची आई अरुणा वामन या स्वतः कळवा पोलिस स्टेशन मध्ये पोलिस कॉन्सेटल म्हणून कार्यरत आहेत.तुझ्या उंच भरारीने आम्हा सर्वांच्या डोळ्यांमध्ये अभिमानाचे अश्रू आणि हृदयात नव्या आशांची ज्योत पेटवली आहे.तुझं हे यश म्हणजे केवळ पदवी नाही.तर धैर्य, शिस्त, संस्कार आणि देशप्रेमाची सर्वोत्कृष्ट साखळी आहे.तू अशीच आकाशाला नवे रंग देत राहो, तुझी झेप काळालाही थक्क करणारी ठरो ! असे गौरवोद्गार समृध्दी चे कुटुंबातील व्यक्तींनी काढले.



## तपोवनातील वृक्षतोड रोखण्याची मागणी – राजकुमार भगत; मुख्यमंत्र्यांना ई–मेलद्वारे निवेदन

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड/राजू गायकवाड** : आगामी कुंभमेळ्याच्या अनुषंगाने नाशिक महानगरपालिकेच्या वतीने तपोवन परिसरात प्रस्तावित वृक्षतोड तात्काळ स्थगित करण्यात यावी, अशी ठाम मागणी स्व. मधुकरराव भगत शहरी व ग्रामीण विकास बहुउद्देशीय संस्था यांच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबतचे निवेदन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांना ई-मेलद्वारे पाठविण्यात आले, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष राजकुमार भगत यांनी दिली.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, तपोवन परिसर हा नाशिक शहराचा फुफ्फुसासमान नैसर्गिक



भाग असून येथील घनदाट वृक्षसंपदा पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

कार्बन डायऑक्साइड शोषून ऑक्सिजन निर्मिती, तापमान नियंत्रण, हवेतील प्रदूषण कमी करणे, भूजल पातळी टिकवणे आणि जैवविविधतेचे संरक्षण यामध्ये या परिसरातील वृक्षांचा मोठा वाटा आहे.कुंभमेळ्यासारख्या पवित्र धार्मिक आयोजनाच्या नावाखाली जर वृक्षतोड करण्यात आली, तर त्याचा पर्यावरणावर तसेच नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन, तज्ज्ञांचा सल्ला आणि पर्यायी पर्यावरणपूरक उपाययोजना राबवूनच कोणताही निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

स्व. मधुकरराव भगत शहरी व ग्रामीण विकास बहुउद्देशीय संस्था मागील सात वर्षांपासून पर्यावरण संरक्षणासाठी कार्यरत असून दरवर्षी हजारो वृक्षांची लागवड व संवर्धन करते. "वृक्षबंध – समाजाशी जोडलेलं नातं" या उपक्रमातून पर्यावरण जनजागृतीचे कार्य सातत्याने सुरू असल्याचेही राजकुमार भगत यांनी सांगितले.

# प्रबोधन, प्रशिक्षण व संशोधन ही लोकशाही समृद्धीची त्रिसूत्री केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

## सभागृहातील चर्चेअंती निर्मित कायद्यांमध्ये जनमाणसाचे प्रतिबिंब दिसते - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**

**राकेश यादव वाडी नागपूर :** राष्ट्रकुल संसदीय अभ्यास मंडळाच्या माध्यमातून राज्यशास्त्राचे विद्यार्थी प्रशिक्षणासाठी येत असतात. या विद्यार्थ्यांना कायदे निर्मितीची प्रक्रिया, संसदीय पद्धत अभ्यासण्याची संधी प्राप्त होते. अशा प्रशिक्षण प्रबोधनातूनच लोकशाही समृद्ध होते. त्यामुळे प्रबोधन, प्रशिक्षण व संशोधन हे समृद्ध लोकशाहीची त्रिसुत्री आहे, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

विधान परिषदेने संमत केलेले महत्त्वपूर्ण विधेयके ठराव आणि धोरणे याविषयी वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे प्रकाशित करण्यात येत असलेल्या संदर्भ समृद्ध ग्रंथ मालिकेतील द्वितीय ग्रंथाचे प्रकाशन केंद्रीय मंत्री श्री. गडकरी यांच्या हस्ते आज विधानपरिषद सभागृहात आयोजित कार्यक्रमात झाले.

यावेळी विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे उपस्थित होत्या.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले, ज्या सभागृहाने १८ वर्ष शिकवीत अनुभवसंपन्न केले आणि देशाची सेवा करण्याची संधी दिली, अशा सभागृहात कार्यक्रमाच्या निमित्ताने पुन्हा येण्याचे भाग्य मिळाले. त्यामुळे या सभागृहातील आठवणींना उजाळा मिळाला. चर्चेद्वारे समोरच्याकडून राज्याच्या विकासासाठी हवे असलेले काढून घेण्याचे कौशल्य याच सभागृहाने दिले. विधान परिषद सभागृहात कायदा निर्मितीवर झालेल्या चर्चेतून परिणामकारक कायद्यांची निर्मिती झाली आहे. या सभागृहात राज्याच्या विविध प्रश्नांवर चर्चा करताना नियमांची लढाई झाली तरी कधी वैयक्तिक संबंधांमध्ये कटूता आली नाही, हीच आपल्या लोकशाहीची समृद्ध परंपरा आहे.

लोकशाहीमध्ये संविधानाने अधिकार व कर्तव्य निश्चित केले आहेत. विकासाची समान संधी यातून निर्माण झाली आहे. लोकशाहीच्या श्रेष्ठ परंपरांचे पालन विधिमंडळाने केले आहे. या ग्रंथांमधून सभागृहातील विचारांचा ठेवा नवीन पिढीसमोर येणार आहे. त्यामुळे या ग्रंथाचे वाचन सर्वांनी करावे, असे आवाहनही केंद्रीय मंत्री श्री. गडकरी यांनी केले.

**चर्चेअंती निर्मित कायद्यांमध्ये जनमानसाचे प्रतिबिंब दिसते - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**



देवेंद्र फडणवीस





कायदा निर्मिती प्रक्रियेत सभागृहांमध्ये होत असलेली चर्चा अत्यंत महत्त्वाची असते. अशा चर्चांमधूनच प्रगल्भ कायद्याची निर्मिती होते. चर्चांमधून निर्मित झालेल्या कायद्यांमध्ये जनमानसाचे प्रतिबिंब दिसून येते. अशा कायद्यांचा निश्चितच लोककल्याणासाठी उपयोग होत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, संविधानकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधान परिषद सभागृहाचे सदस्य होते. या सभागृहाने अतिशय हुशार, अनुभवी सदस्य दिले आहेत. त्यांच्या हुशारी, अनुभवाचा लाभ कायदा निर्मिती प्रक्रियेत झाला आहे. या सभागृहाने पारित केलेले कायदे, ध्येयधोरणे यावर आधारित ग्रंथसंपदा निर्माण होत आहे. आपल्या सभागृहातील कामकाजाचे 'रेकॉर्ड' होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. रेकॉर्ड नसल्याने अनेक ऐतिहासिक संदर्भांना आपण मुकलो आहोत.

पश्चिमात्य देशांमध्ये ' रेकॉर्ड' असल्यामुळे त्यांचे संदर्भ आपणास घ्यावे लागतात. आपली लोकशाही पद्धत त्यांच्यापेक्षा दोन हजार वर्षांनी जुनी आहे, मात्र रेकॉर्ड नसल्याने संदर्भ उपलब्ध होत नाहीत. इतिहास हा संकलित करावयाचा असतो. त्यामुळे सभागृहातील भाषणे, निर्मित कायदे यांचे संकलन करून प्रकाशित केलेला ग्रंथ हा नेहमी ऐतिहासिक दस्ताऐवज ठरेल, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

राज्याच्या मागास भागाचा विकास करण्यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी 1950 नंतर पहिल्यांदा संविधानात उपलब्ध कलमांचा उपयोग केला. त्यामुळे विकासाचा अनुशेष दूर करण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न झाले, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या कार्याचा गौरवही केला.

**राज्याच्या विकासात सभागृहाचे उत्तुंग योगदान - विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे**

देशामध्ये द्वि सभागृह पद्धत अत्यंत महत्त्वाची आहे. प्रभावी कायदे निर्मिती यामुळे शक्य झाली आहे. राज्याच्या विविध प्रश्नांवर चर्चा घडवून आणल्यानंतर निर्मित होणारे कायदे तसेच ध्येयधोरणे राज्याच्या विकासासाठी पोषक ठरतात. राज्याच्या विकासामध्ये विधान परिषद सभागृहाचे उत्तुंग योगदान आहे, अशा शब्दात सभागृहाचे महत्त्व विधान परिषद सभापती प्रा राम शिंदे यांनी अधोरेखित केले.

निर्दोष कायदे बनवण्यासाठी द्वि सभागृहाची अत्यंत आवश्यकता आहे. या वरिष्ठ सभागृहातील अनुभव संपन्न सदस्यांकडून झालेल्या चर्चेअंती निर्मिती कायदा हा अत्यंत प्रभावशाली ठरतो. कायदे निर्मितीची प्रक्रिया अधिकाधिक निर्दोष करण्याची जबाबदारी वरिष्ठ सभागृहावर आहे. त्यामुळे कायदा निर्मिती प्रक्रियेत येथे झालेली चर्चा ही ऐतिहासिक ठरत असल्याचेही सभापती प्रा. शिंदे यांनी प्रतिपादित केले.

प्रास्ताविकात उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राच्या कार्याविषयी माहिती देत विधान परिषदेतील कायदे ठराव नियम यावर आधारित ग्रंथांविषयी माहिती दिली. ग्रंथाच्या संपादन कामामध्ये पत्रकार योगेश त्रिवेदी, विलास मुकादम व किशोर आपटे यांनी सहभाग दिल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी केले. तसेच सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी निलेश मदाने यांनी केले. कार्यक्रमाला मंत्री, विधिमंडळ सदस्य, पत्रकार अधिकारी व संसदीय अभ्यास वर्गाचे विद्यार्थी उपस्थित होते.

## पाण्याच्या टँकरची स्कुटीला धडक, 21 वर्षीय तरुणाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : पाण्याच्या टँकरने स्कुटीला धडक दिल्याने 21 वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी 6 डिसेंबर रोजी तळोजा पोलीस ठाण्यात टँकर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.अमीर शेख (राहणार तळोजा) हा ॲक्सिस मोटरसायकल क्रमांक एम एच 46 सीझेड 0128 घेऊन घरी परत येत होता. पेंधर फाटा रेल्वे पटरीच्या पुढे तळोजा फेस टू कडे जाणाऱ्या मार्गावर समोरून आलेल्या पाणी टँकर क्रमांक एम एच 46 बीएम 2973 ने स्कुटीला धडक दिली. या धडकेत अमीर जखमी झाला. त्याला एमजीएम हॉस्पिटल, कामोठे येथे नेण्यात आले. सहा डिसेंबर रोजी उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला.

## भावावर चाकूने वार करत केला हत्येचा प्रयत्न

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** मुलांच्या भांडणाचा राग मनात धरून सख्ख्या भावाने सख्ख्या भावावर चाकूने वार करत त्याच्या हत्येचा प्रयत्न केला. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात 6 डिसेंबर रोजी उसामा दस्तगीर सुबेदार (नॅशनल हॉटेलसमोर, तळोजा) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.हुजेफा दस्तगीर सुबेदार हा पत्नी आणि मुलांसह तळोजा येथे राहतो. 5 डिसेंबर रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास त्याचा मुलगा उस्मान आणि भाऊ उसामा यांचा मुलगा हुसेन यांच्यात खेळत असताना वाद झाला. यावेळी मुलांमध्ये झालेला भांडण्याचा वाद मिटवून घेतला. 6 डिसेंबर रोजी सकाळी साडे अकराच्या सुमारास हुजेफा हा मुंबई येथे जात असताना त्याचा भाऊ उसामा याने माझ्या पत्नीला शिवीगाळ का केली, तुला मारून टाकेल असे बोलून लोखंडी सूऱ्याने हुजेफा याच्या पाठीवर डाव्या हाताच्या काखेत आणि डोक्याच्या पाठीमागे वार करून त्याला गंभीर जखमी केले. त्यानंतर उसामा तेथून पळून गेला. जखमीवर खारघर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# सर्वसामान्यांचे नेतृत्व बबन बारगजे

भारतीय जनता पार्टीचे रायगड मधील जुने कार्यकर्ते म्हणून बबन बारगजे यांची ओळख आहे . खरंतर ग्रामीण भागातून येऊन शहरांमध्ये नोकरी धंदा सांभाळून सामाजिक व कोणत्याही पक्षाचं काम करणं तसं अवघड आहे . परंतु बबन बारगजे हे त्या गोष्टीला अपवाद आहेत . बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्यातील पिंपळनेर या गावचे असलेले बबन बारगजे हे नाव कळंबोली पनवेल व उत्तर रायगड जिल्ह्यातील भाजपा परिवाराला सुपरिचीत आहेत . बबन बारगजे यांचा जन्मदिवस म्हणजे १५ डिसेंबर १९७० . घरची हलाखीची परिस्थिती अशा परिस्थितीमध्ये कसंतरी बारावीपर्यंत शिक्षण झालं . मुळातच धडपड करण्याची प्रवृत्ती असल्यामुळे बबन बारगजे यांना १९८९ मध्ये रेल्वे टीसीचा कॉल आला . आणि बारावीला शिक्षण घेत असताना नोकरीच्या शोधात मुंबईला आले . रेल्वेची परीक्षा तर दिली परंतु बाकीच्या सहकाऱ्यांनी सांगितले तू आता कंडक्टरचा बॅच काढ आम्ही तुला बेस्ट उपक्रमामध्ये नोकरीला लावतो . उच्च शिक्षण घेण्याची घरची परिस्थिती नसल्यामुळे त्यांनी मुंबईला बस गाडीवर क्लिनर म्हणून राहून नोकरी करण्याचे ठरविले . त्यानंतर वेगवेगळ्या ठिकाणी



चालक म्हणून काम केले व पुढे १९९४ ला ठाणे महानगरपालिका परिवहन सेवेत चालक म्हणून त्यांना नोकरी लागली . परंतु कमी पगारामध्ये भागत नसल्यामुळे दुसरीकडे नोकरीचा प्रयत्न चालूच होता १९९७ मध्ये बेस्ट उपक्रमामध्ये नोकरीसाठी एप्लीकेशन केलेले होते तेव्हा त्यांना नोकरीसाठी कॉल आला व पहिल्याच प्रयत्नामध्ये बेस्ट उपक्रमामध्ये चालक म्हणून नोकरी मिळाली १९९८ पासून बेस्ट उपक्रमामध्ये ते नोकरी करीत आहेत नोकरी करत असताना ठाणे, चेंबूर या ठिकाणी भाड्याने राहिले व त्यानंतर स्वतःचे घर घेऊन कळंबोली मध्ये २००४ पासून स्थायिक झाले २००६ ला कळंबोली मध्ये भारतीय जनता पार्टीचा एक कार्यक्रम लावला होता . त्या कार्यक्रमांमध्ये सूत्रसंचालन केले व तत्कालीन रायगड जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील यांनी बबन बारगजे यांच्यातील नेतृत्व गुण ओळखले व त्यांची कळंबोली शहर उपाध्यक्ष म्हणून निवड केली. शहर उपाध्यक्ष झाल्यानंतर बबन बारगजे यांनी सामाजिक कार्यासाठी झोकून दिले . बबन बारगजे यांच्या वर लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांचा प्रभाव होता . त्यानंतर २००७ साली तत्कालीन शहराध्यक्ष यांनी राजीनामा दिला व बबन बारगजे यांना शहराध्यक्ष म्हणून नियुक्त केले . कळंबोलीचे शहराध्यक्ष असताना तब्बल सात वर्ष बबन बारगजे यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला व सर्व पक्षांबरोबर मित्रत्वाचे संबंध निर्माण करून आपली वेगळी ओळख निर्माण केली . कळंबोली मध्ये शिवसेना , शेकाप व भाजपा यांची युती होती २०१२ ला जिल्हा परिषदेला प्रिया मुकादम यांना उमेदवारी देण्यात आली तीच उमेदवारी बबन बारगजे यांना ही मिळत होती परंतु तेव्हा पैसा आणि या सगळ्या गोष्टी त्यामुळे त्यांनी निवडणूक लढवली नाही . त्यांना स्वीकृत सदस्य म्हणून घेण्याचे ठरले होते परंतु पुढे निवडणूक झाल्यानंतर या सगळ्या गोष्टी इतिहास जमा झाल्या व त्यानंतर एक वर्ष बबन बारगजे यांनी शेकापक्षाबरोबर काम केले . त्याच वर्षी म्हणजे २०१४ला आमदार प्रशांत ठाकूर यांनी काँग्रेस मधून भाजपामध्ये प्रवेश केला . बबन बारगजे यांचा पिंड हा भाजपाशी निगडित असल्यामुळे आमदार प्रशांत ठाकूर यांनी बबन बारगजे यांना परत भाजपात येण्याचे आवाहन केले . व परत एक वर्षानंतर बबन बारगजे यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला आणि त्यानंतर परत त्याच जिद्दीने बारगजे यांनी भाजपाचे काम सुरू केले . आमदार प्रशांत ठाकूर यांनी बबन बारगजे यांच्यावर २०१७ च्या महानगरपालिका निवडणुकीमध्ये विश्वास दाखवला . व बबन बारगजे यांच्या पत्नी सौ बायजा बबन बारगजे यांना प्रभाग आठ मधून उमेदवारी दिली . त्यावेळी शेकापक्ष व काँग्रेस यांचा कळंबोली मध्ये जोर होता तरीसुद्धा त्यांनी जोरदार टक्कर दिली परंतु थोड्याशा मताने त्यांचा पराभव झाला . त्याचवेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी बबन बारगजे यांना विश्वास दिला की तुम्ही हरले नाही जिंकला आहात त्यामुळे परत कामाला लागा . आणि त्याचवेळी भाजपा भटके विमुक्त आघाडीच्या रायगड जिल्हाध्यक्ष पदी त्यांची नियुक्ती केली . बबन बारगजे यांनी विविध आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला ओबीसी आंदोलनामध्ये त्यांच्यावर केस दाखल झाली . परंतु कोणत्याही गोष्टीची तमा न बाळगता पक्षाचे काम अविरतपणे करत राहिले आमदार प्रशांत दादा ठाकूर यांनी २०२० ला सुद्धा व त्यानंतर आजपर्यंत त्यांच्यावर भटके विमुक्त आघाडीच्या उत्तरा रायगड जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवली व त्यांनी ती अगदी इमानेइतबारे पार पाडली . बबन बारगजे यांनी सुरुवातीच्या काळामध्ये कळंबोलीतील वीज समस्या , पाणी समस्या यावर वेळोवेळी आवाज उठविला . त्यामुळे सर्वसामान्यांमध्ये त्यांची ओळख निर्माण झाली . बेस्ट उपक्रमामध्ये सुद्धा नोकरी करीत असताना त्यांनी सुरुवातीला बेस्ट वर्कर्स युनियन मध्ये काम केले त्यानंतर भाजपा बेस्ट कामगार संघाचे उपाध्यक्ष म्हणून काम केले . कामगारांच्या विविध समस्यासाठी वेळोवेळी आंदोलने केली अशा या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा आज वाढदिवस साजरा होत आहे . त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना लोकनेते रामशेठ ठाकूर आमदार प्रशांत दादा ठाकूर त्याचप्रमाणे बाळासाहेब पाटील व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिलेल्या आहेत .

यावर्षी सुद्धा बबन बारगजे हे प्रभाग आठ मधून निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत . त्यांच्या या इच्छा पूर्ण होत हीच प्रार्थना .

**संतोष शिवदास आमले**
**संपादक दैनिक युवक आधार**

## लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरी व द्रोणागिरी फाउंडेशन तर्फे रस्ता सुरक्षा जनजागृती शिबिर व हेल्मेट वाटप संपन्न

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर/उरण प्रतिनिधी** : नाईकनगर येथे आज लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरी आणि द्रोणागिरी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराअंतर्गत हेल्मेटचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमात पालकांना व विद्यार्थ्यांना हेल्मेट भेट देण्यात आली. रस्ते अपघात टाळण्यासाठी हेल्मेट वापरण्याचे महत्त्व यावेळी उपस्थितांना समजावून सांगण्यात आले.या उपक्रमाअंतर्गत एकूण ३५० हेल्मेटचे वाटप करण्यात आले. नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत केले असून आयोजकांच्या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करण्यात आले. लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरी आणि द्रोणागिरी फाउंडेशन भविष्यातही अशा जनहितकारी उपक्रमांचे आयोजन करणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.आय सी आय सी लॉम्बर्ड आणि सेवा सहयोग फोउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात




आला या कार्यक्रमात उपस्तित मान्यवर गणेश पाटील,अजय म्हात्रे विनय बर्वे (लायन साहेबराव ओहोळ – अध्यक्ष, लायन्स क्लब ऑफ उरण लायन अंकन शाह – डी सी रिलीव्ह द हंगर पी एम जे एफ लायन डॉ. नमिता मिश्रा – जी ए टी समन्वयक, प्रमुख पाहुणे पी एम जे एफ लायन विजय गणात्रा – द्वितीय उपराज्यपाल (सेकंड व्हाईस गव्हर्नर)

लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरी:

अध्यक्ष – लायन भूमिका सिंग पदाधिकारी व सदस्य:

लायन मोनिका चौकर – सचिव

लायन नम्रता पुंकर

लिओ लायन राहुल भोईर

लिओ गोपाळ विटकर

या उपक्रमासाठी मोलाची मदत केलेली:दीपक दळी, सुमेध पाटील, पप्पू सूर्यराव हे सर्व मान्यवर उपस्थित होते.

## उदगीर पोलीस प्रशासन हालगर्जी शहरातील वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा नागरिकांचे जीव धोक्यात प्रशासनाचे मौन चिंताजनक

**दैनिक युवक आधार**

**उदगीर प्रतिनिधी (बालाजी तेलंगे) :** उदगीर शहरातील वाहतूक व्यवस्था अक्षरश कोलमडली असून वाढती अनियमितता आता नागरिकांच्या सुरक्षिततेवर थेट गदा आणत आहे. वाढती वाहनसंख्या, रस्त्यांचे अयोग्य नियोजन, चौकांवरील वाहतूक नियंत्रणाचा अभाव आणि सातत्याने होणारी नियमांची पायमल्ली या सर्व कारणांमुळे उदगीरची वाहतूक परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे.उमा चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, भाजी मार्केट, चौवारा, सराफ लाईन, हनुमान कट्टा, कॅप्टन चौक, शाहू चौक, नांदेड नाका, जय जवान चौक, मुकावार चौक आणि पत्तेवार चौक या शहरातील व्यस्त भागात दिवसभर वाहतूक कोंडीची स्थिती कायम असते. चुकीच्या ठिकाणी उभी केली जाणारी वाहने, रस्त्या वरच प्रवासी उचलणाऱ्याऑटोरिक्षा, फुटपाथवरील अतिक्रमण आणि ध्वनीप्रदूषणामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. गर्दीच्या वेळेत पादचाऱ्यांसाठी रस्ता ओलांडणे ही जवळपास अशक्यप्राय परिस्थितीनिर्माण होते.बुलेट मोटारसायकलींना बसवलेल्या बदललेल्या सायलेंसर मधून येणारा कर्णकर्कश आवाज, शाळा-कॉलेज परिसरात तरुणांकडून होणारे रेसिंग, बेगमर्यादचे, उल्लंघन व बाहतूक शिस्तीचा पूर्ण अभाव यामुळे परिस्थिती आणखीनच बिकट बनली आहे. रात्री उशिरापर्यंत मोठ्या आवाजात साऊंड सिस्टीम लावून फिरणाऱ्या वाहनांनी तर नागरिकांचा त्रास शिगेला पोहोचवला आहे. या सर्व प्रकारांवर प्रशासनाकडून कोणतीही कारवाई होत नसल्याने संबंधितांना मोकळे रान मिळत असल्याचा नागरिकांचा आरोप आहे. अल्पवयीन मुलांकडून मोठ्या प्रमाणावर वाहनचालक होत असल्याचेही स्पष्ट जाणवत आहे. परवाना नसलेल्या या तरुणांकडून मुख्य रस्त्यांवर बेदरकारपणे वा हनचालक केल्याने अपघाताचा धोका प्रचंड वाढला आहे. याकडे पोलिस आणि आरटीओने दुर्लक्ष केल्याची भावना जनतेमध्ये प्रबळ आहे. बाहतूक पोलीस चौकांवर दिसत नसणे, ध्वनीप्रदूषणावरील कारवाई थांबणे, बदललेल्या सायलेंसरवर कोणतीही दखल न घेणे, अनधिकृत पार्किंगला आळा न बसणे, तसेच संपूर्ण शहरासाठी वाहतूक नियंत्रणाचा आराखडा उपलब्ध नसणे या सर्व प्रश्नांची उत्तरे प्रशासन देत नाही.

पोलिस विभाग, नगरपरिषद आणि प्रशासन तिन्ही यंत्रणांचा या गंभीर समस्येबाबतचा मौन नागरिकांना अधिक अस्वस्थ करत आहे. शहरा-तील वाहतूक नियंत्रणाचा अभाव कोणत्याही क्षणी मोठ्या दुर्घटनेला आमंत्रण देऊ शकतो, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत. तातडी-ने कठोर कारवाई, चौकांवर वाहतूक पोलीस, ध्वनीप्रदूषणावरील नियंत्रण, तसेच रस्त्यांवरील अतिक्रमण दूर करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## थोडक्यात

### पनवेल तालुका पोलिसांनी केले जनजागृतीसाठी मोटर सायकल रॅलीचे आयोजन



**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर** : पनवेल तालुका पोलिसांनी जनजागृती करण्याच्या उद्देशाने हद्दीमध्ये मोटर सायकल रॅलीचे आयोजन केले होते.वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनखाली पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील केळवणे जे टी ते केळवणे गाव, बस स्टॉप, शाळा येथे मोटर सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते .सदर मोटर सायकल रॅलीमध्ये कोस्टल सेक्युरिटी हेल्पलाइन नंबर 1093 चे बॅनर व पोस्टर ने जनजागृती करण्यात आलेले आहे. तसेच उपस्थित सागर रक्षक व नागरिक यांना सागरी सुरक्षेच्या अनुषंगाने योग्य त्या सूचना देण्यात आल्या . तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने कासारभट, केळवणे येथे पोलिसांच्या पथकाने भेटी देऊन सुरक्षेच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले .

### विस्टा फूडतर्फे वाघिवली शाळेला दोन संगणक



**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : विस्टा फूड लिमिटेड तळोजा एमआयडीसी यांनी आजपर्यंत शिक्षणासाठी मोठे योगदान दिले असून रायगड जिल्हा परिषदेच्या वाघिवली मराठी विद्यामंदिरास दोन संगणक देण्यात आले. यावेळी प्रवीण ठाकूर (जीएम-प्लांट हेड), सौ. इंद्रायनी आगलावे (डीजीएम-ॲडमिन), निलेश म्हात्रे (प्लांट मॅनेजर), प्रथमेश पाटील (असिस्टंट मॅनेजर), अजित मिश्रा (आयटी विभाग) यांचे शाळा समितीचे अध्यक्षा निशा मुंडकर व कार्यक्रमचे संयोजक गणेश मुंडकर यांनी शाल, पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील यांनी यावेळी बोलताना कंपनीचे सल्लागर चंद्रशेखर सोमण व एमडी भुपिंदर सिंग यांचे कौतुक करुन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या १ किमीच्या अंतरावर असलेल्या परंतू सुखसोयीपासून उपेक्षित असलेल्या वाघिवली शाळेला संगणक देवून एक वेगळा समाजात संदेश दिले असल्याचे सांगून यापूर्वी समुद्राचा वेढा असलेल्या या गावात आपण सार्वजनिक काम केल्याची आठवण करुन दिली. यावेळी सरपंच अनिल पाटील, समितीचे सदस्य गणेश पाटील व ग्रामस्थ उपस्थित होते.

### सोसायटीच्या व्हाट्सअप ग्रुपमधून काढल्याने केली मारहाण

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : सोसायटीच्या व्हाट्सअप ग्रुपमधून काढून टाकल्याचा राग मनात धरून मारहाण केल्याप्रकरणी युवराज उत्तम घागरे, अमृत रवींद्र बेलदार, ओमकार मोकल (तिघेही राहणार बागेश्री सोसायटी, खारघर) यांच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात नऊ डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.विश्वास धनावडे हे बागेश्री सोसायटी, सेक्टर 40, खारघर येथे राहत असून त्यांच्या सोसायटीतील आशिष याने अमृत बेलदार व ओमकार मोकल यांना सोसायटीच्या व्हाट्सअप ग्रुपमध्ये ॲड केले. ते सोसायटीचे सभासद नसल्याने त्यांना धनावडे यांनी ग्रुपमधून काढून टाकले. त्यानंतर त्यांना ओमकार याने फोन करून बिल्डिंगच्या खाली या असे सांगितले. धनावडे खाली आले असता ग्रुपमधून का काढले असे विचारले. यावेळी तुम्ही ग्रुपमध्ये गैरसमज पसरवत आहेत व माझ्या नावाची बदनामी करत आहात म्हणून तुम्हाला ग्रुपमधून काढून टाकल्याचे धनावडे यांनी सांगितले. यावेळी अमृतने धनावडे याना हाताबुक्याने डोक्यात मारहाण केली आणि ओमकार आणि युवराज यांनी काठीने मारहाण केली. त्या मारहाणीत धनावडे जखमी झाले. त्यांची पत्नी सोडवण्यासाठी आली असता तिचे देखील केस सोडले आणि तिला किरकोळ दुखापत झाली.

# जालन्यात 'पोकरा' योजनेच्या घोटाळ्याची सावली गडद

## घोटाळाप्रकरणी दोन कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचे पोलिसांना दिले पत्र

**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र/राजू शिंदे** : जालना जिल्ह्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना अर्थात पोकरा योजनेच्या घोटाळ्याची रहस्यमयी कहाणी संपता संपेना. आता पुन्हा नवा ट्विस्ट या घोटाळ्याच्या निमित्ताने पुढे आला आहे. उपविभागीय कृषी अधिकारी कार्यायाच्यावतीने कथित घोटाळा प्रकरणी दोन लेखाधिकाऱ्यांसह दोन कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचे पत्र सदर बाजार पोलिसांना दिले आहेत.

दरम्यान, जालना जिल्ह्यात नानाजी देशमुख कृषि संजीवनी योजना अर्थात पोकरा योजनेत भ्रष्टाचार झाला. या भ्रष्टाचाराचा पाठपुरावा सामाजिक कार्यकर्ते सुरेश गवळी यांनी केला. मध्यंतरी या प्रकणाचे पडसाद विधानसभेत देखील उमटले होते. कृषीमंत्र्यांनी तात्काळ कारवाईचे आदेश दिले होते.

आता कृषी विभागाच्या दोन लेखाधिकाऱ्यांसह दोन कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात यावा, याबाबत जालना येथील उपविभागीय कृषी अधिकाऱ्यांनी सदर बाजार पोलिसांना पत्र दिले आहे. दरम्यान, याप्रकरणी वरिष्ठांचे मार्गदर्शन मागवून गुन्हा दाखल करण्याची कारवाई केली जाणार असल्याचे पोलिस निरीक्षक संदीप भारती यांनी सांगितले.

पोकरा योजनेतून जालना जिल्ह्यातील चार तालुक्यात ३ हजार २५८ शेडनेटगृहे उभारण्यात आली होती. मात्र, या योजनेत तत्कालीन उपविभागीय कृषी अधिकारी शीतल चव्हाण आणि इतर चार अधिकाऱ्यांनी कोट्यवधी रुपयांचा घोटाळा केल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते सुरेश गवळी यांनी केली होती.

या प्रकरणी शीतल चव्हाण यांना मागील वर्षी निलंबित करण्यात आले असून जिल्ह्यातील या योजनेची पुन्हा एकदा १८ अधिकाऱ्यांच्या ३८ पथकांनी झाडाझडती घेतली. दरम्यान, यानंतर आता कृषी विभागाकडून या घोटाळ्यातील दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले असून शनिवार, ६ डिसेंबर रोजी जालना येथील उपविभागीय कृषी अधिकारी प्रशांत पवार यांनी सदर बाजार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याबाबत पत्र दिले आहे. त्यामुळे आता पोकरा घोटाळ्यात आणखी काही अधिकारी - कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला जाण्याची शक्यता आहे. याबाबत सदर बाजार पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भारती यांना विचारले असता पत्र आलेले असून प्रकरण थोडे किचकट असल्यामुळे वरिष्ठांकडून मार्गदर्शन मागवण्यात आले असून त्यानंतर गुन्हा दाखल करण्याची कारवाई केली जाईल, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. दरम्यान, उपविभागीय कृषी अधिकारी प्रशांत पवार यांना विचारले असता ते म्हणाले, गुन्हा दाखल झाल्यानंतर नावे समोर येतील. पोलिसांनी वरिष्ठांकडून मार्गदर्शन मागवले आहे. त्यानंतर पुढील कारवाई होईल.

**२५० कोटींचा घोटाळ्याचा दावा**

पोकरा योजनेत २५० कोटींचा घोटाळा केल्याचा दावा तक्रारदार सुरेश गवळी यांनी केलेला असून या प्रकरणात आतापर्यंत शीतल चव्हाण यांच्यावर निलंबनाची कारवाई झालेली आहे. दरम्यान, आता कृषी विभागातील दोन कर्मचाऱ्यावर गुन्हा दाखल करण्याबाबत पोलिसात पत्र देण्यात आलेले असल्यामुळे ते दोन कर्मचारी कोण ? याबाबत चर्चेला उधाण आले असून कृषी विभागात खळबळ उडाली आहे.

## मुरलीधर ठाकूर यांच्यातर्फे केळंबा देवस्थानाला दहा पंख्यांचे दान

**दैनिक युवक आधार**

**उलवे,वार्ताहर** : पेण तालुक्यात खरोशी येथे प्रसिद्ध केळंबादेवी आहे. निसर्गाच्या कुशीत वसलेले हे देवस्थान नयनरम्य आहे. नवरात्रोत्सवात येथे सुमारे एक कोटी भाविक दर्शनाला येतात, यात महिलांची संख्या लक्षणीय असते. मात्र खरोशी ग्रामस्थ कुणाही भाविकाची गैरसोय होणार नाही, याची काळजी घेतात, असे ग्रामस्थांनी सांगितले. आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी बुधवारी (ता. १०) केळंबादेवीचे दर्शन घेतले. यावेळी मंदिराचे पुजारी वसंत गावंड यांनी केळंबादेवीची प्रतिमा, शाल आणि श्रीफळ देऊन महेंद्रशेठ घरत यांचे स्वागत आणि सन्मान केला. यावेळी मंदिराचा संपूर्ण परिसर पाहून महेंद्रशेठ आनंदित झाले. ते म्हणाले, हाकेच्या अंतरावर असणारे आणि निसर्गाच्या कुशीत वसलेले केळंबादेवीचे स्थान मनाला प्रसन्न करणारे आहे. मंदिर देवस्थानला



येत्या काळात काही सहकार्य लागल्यास आपण निश्चितच आनंदाने करू. महेंद्रशेठ घरत हे दानशूर आहेतच, पण आता त्यांच्या सहकारीही त्यांचे अनुकरण करत आहेत. त्याचाच प्रत्यय केळंबा देवी दर्शनावेळी आला. महेंद्रशेठ घरत यांचे जुने सहकारी मुरलीधर ठाकूर यांनी केळंबादेवीला दहा पंख्यांचे दान केले. मंदिराचे पुजारी वसंत गावंड यांच्याकडे महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते ते स्वाधीन करण्यात आले. यावेळी मुरलीधर ठाकूर, अंगद ठाकूर, प्रमोद घरत आदी उपस्थित होते. यावेळी प्रमोद घरत यांनी ग्रामस्थ मंडळ, खरोशी यांच्या वतीने आभार मानले.

## लोकहितासाठी झटणारा खरा लोकनेता – सरकटे

**दैनिक युवक आधार**

**राजू शिंदे उपसंपादक** : मंठा तालुक्यातील तळणी येथे लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांची ७६ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी स्व. मुंडे यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले.कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रसंत भगवान बाबा तसेच स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. या वेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर सरकटे, भाजपा तालुकाध्यक्ष नितीन राठोड, तालुका उपाध्यक्ष शरद पाटील, सरपंच गौतम




सदावर्ते, शिवसेनेचे ज्ञानेश्वर सरकटे, मंठा ग्रामीण अर्बनचे नितीन सरकटे यांच्यासह भगवान देशमुख, रामेश्वर सरकटे, कैलास सरकटे, अविनाश राठोड, केशवराव येऊल, नवनाथ खंदारे, कृष्णा खंदारे, डॉ. किरण नागरे, सतीश सरकटे, ज्ञानेश्वर येऊल, वैभव कांगणे, माधव खूळे, मुरलीधर खंदारे आदी उपस्थित होते.यावेळी मार्गदर्शन करताना ज्ञानेश्वर सरकटे म्हणाले, "स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांनी सामान्य जनतेसाठी केलेले कार्य आजही प्रेरणादायी आहे. समाजातील शेवटच्या घटकाला न्याय देण्याची त्यांची तळमळ आदर्शवत होती.

लोकहितासाठी झटणारा हा खरा लोकनेता होता. त्यांच्या विचारांवर चालणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल."

## थेपडे विद्यालय म्हसावद येथे बेटी बचाव बेटी पढाव अभियान



**दैनिक युवक आधार**

**जळगाव /समाधान पाटील :** महिला व बालविकास आयुक्तालय आणि मा. जिल्हाधिकारी जळगाव यांच्याकडून आयोजित बेटी बचाव बेटी पढाव अभियान राबविण्यात येत असून या अंतर्गत आज रोजी विविध स्पर्धा(निबंध स्पर्धा , रांगोळी स्पर्धा, वकृत्व स्पर्धा) आणि रॅलीचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे प्राचार्य श्री जी डी बच्छाव सर तसेच दैनिक युवक आधारचे समाधान भाऊ पाटील उपस्थित होते. प्रथमतःबेटी बचाव बेटी पढाव या अभियानाअंतर्गत11वी व 12वी च्या विद्यार्थ्यांना घेऊन शिक्षक कॉलनी म्हसावद येथे रॅलीचे आयोजन करण्यात आले या रॅलीत विद्यालयाचे प्राचार्य श्री जी डी बच्छाव सर आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व शिक्षक बंधू भगिनी उपस्थित होते. बेटी बचाव बेटी पढाव मुलगी शिकली प्रगती झाली हा संदेश या रॅलीतून देण्यात आला तसेच रांगोळी स्पर्धेत विद्यार्थिनी अतिशय सुंदर रांगोळ्या या रांगोळ्यातून वंशाचा दिवा कशाला हवा वंशाची पणती ही लावा हा संदेश देण्यात आला त्याचप्रमाणे बेटी बचाव बेटी पढाव या विषयावर निबंध स्पर्धा आणि वकृत्व स्पर्धा ही घेण्यात आली. या अभियानासाठी सर्व शिक्षक बंधू भगिनींनी अनमोल असे सहकार्य केले.

## देशाला कॉंग्रेसशिवाय पर्याय नाही : महेंद्रशेठ घरत

### महेंद्रशेठ घरत यांची आई गावदेवी चषक विंधणेला एक लाखांची देणगी

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी :** "सर्वसामान्य जनता महागाईच्या आगीत होरपळून निघाली आहे. सत्ताधाऱ्यांना जनतेशी देणेघेणे नाही. जेलमध्ये जाण्यापेक्षा भाजपमध्ये जाणारी मंडळी वाढली आहे. भाजपमध्ये गेलेल्यांची अवस्था 'ना घर का ना घाट का' अशी झाली आहे. तेथे भल्याभल्यांना शेवटच्या रांगेत उभे राहावे लागतेय. त्यांना उंबरठ्या बाहेर ठेवले जात आहे. त्याउलट परिस्थिती कॉंग्रेसमध्ये आहे. कार्यकर्त्यांना कॉंग्रेसमध्ये सन्मान आहे. कॉंग्रेस पक्ष सर्वधर्म समभाव जोपासतोय. त्यामुळे देशाला कॉंग्रेसशिवाय पर्याय नाही," असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत विंधणे येथे म्हणाले. त्यांच्या हस्ते आई गावदेवी क्रिकेट चषकाचे उद्घाटन झाले. यावेळी त्यांनी एक लाख रुपयांची देणगी दिली.

खोपटे ते विंधणे अशी कॉंग्रेसची



भव्य रॅली काढण्यात आली. महेंद्रशेठ घरत रॅलीच्या माध्यमातून विंधणे येथील क्रिकेट मैदानावर आले. फटाक्यांच्या आतषबाजीत त्यांचे भव्यदिव्य स्वागत करण्यात आले. त्यानंतर क्रिकेट स्पर्धांचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. यावेळी मैदान कॉंग्रेसमय झाले होते. जुनेजाणते निष्ठावंत कार्यकर्ते एकत्र आल्याने महेंद्रशेठ घरत यांनाही आनंद झाला. त्यांनी सर्व निष्ठावंत कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले आणि आभारही मानले.

यावेळी मिलिंद पाडगावकर- महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस सरचिटणीस, मार्तंड नाखवा- अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश फिशर मॅन, विनोद म्हात्रे- तालुका अध्यक्ष, डॉ. मनिष पाटील- माजी सदस्य रायगड जिल्हा परिषद, अलंकार परदेशी, अविनाश ठाकूर, मुरलीधर ठाकूर, प्रेमनाथ ठाकूर, लंकेश ठाकूर, वैभव पाटील, संजय ठाकूर, विनोद पाटील, घनश्याम पाटील, बी. एम. ठाकूर, रामनाथ पंडित,अंगद ठाकूर, राजेश ठाकूर, उमेश भोईर, विवेक म्हात्रे,आनंद ठाकूर, मंगेश म्हात्रे, प्रसाद पाटील आणि विंधणे येथील कॉंग्रेसचे जुनेजाणते कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पैसे उचलले एकाकडून, जमीन विकली दुसऱ्यालाच

## दिनेश झिंगे व अन्य ९ जणांनी लावला २५ लाखांना चुना

## अरिहंत सुपरस्ट्रक्चर्स यांच्यावतीने गुन्हा दाखल करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** मुंबई महानगर प्राधिकरण क्षेत्रामध्ये झपाट्याने विकास होत आहे. होणाऱ्या विकासाच्या अनुषंगाने या ठिकाणी रहिवासी संकुले उभारणे ही काळाची गरज बनली आहे. गृहनिर्माण संकुले बांधत असताना प्रथितयश विकसकांना स्थानिक शेतकऱ्यांकडून जमिनी विकत घ्याव्या लागतात. परंतु अशा प्रकारे जमीन खरेदी करत असताना स्थानिकांनी विकसकाला टोपी लावल्याचे प्रकरण समोर आले आहे. खालापूर तालुक्यातील मौजे चौक मानिवली येथील भूधारक दिनेश झिंगे व अन्य ९ यांनी अरिहंत सुपरस्ट्रक्चर्स यांची धादांत फसवणूक केल्याचे प्रकरण बाहेर आले आहे. खालापूर तालुक्यातील मौजे चौक मानिवली येथील जुना सर्वे क्रमांक १५ (नवीन सर्वे क्रमांक १५/२) वारील ४१ गुंठे जमीन खरेदी करण्याचे अनुषंगाने समझोता करार करण्यात आला होता.हा करार ४ फेब्रुवारी २०२५ रोजी दोन्ही पक्षांनी अटी शर्ती राजी करून जमीन खरेदी व्यवहारातील निकष अंतिम करण्यात आले होते. अरिहंत सुपरस्ट्रक्चर्स लिमिटेड तर्फे संचालक अशोक छाजेड यांच्यातर्फे अधिकृत स्वाक्षरी करते विनोद दुबे आणि दिनेश राम उर्फ रामचंद्र झिंगे, काशिनाथ बारकू कोंडिलकर, जागृती राम उर्फ रामचंद्र झिंगे, जानकी राम उर्फ रामचंद्र झिंगे, दत्तात्रेय बारकू कोंडिलकर, मनीषा मधुकर गावडे, विशाखा रामचंद्र खारकर, सीताबाई राम गावडे, सविता सुदाम तिखंडे, आराध्या चंद्रकांत वाडेकर यांच्या दरम्यान समझोता करार संपन्न झाला होता. त्या कराराअन्वये आजपर्यंत तब्बल २५ लाख रुपये भूधारकांनी उचलले आहेत. सदर १० व्यक्तींचे सोबत ओमकार सुदाम तिखंडे देखील या षडयंत्रात सहभागी आहे. एका जमीन खरेदी करणाऱ्या सोबत समझौता करार केलेला असून तसेच त्या पोटी तब्बल २५ लाख रुपयांचे घसघशीत मूल्य उचललेले असून देखील दिनेश राम उर्फ रामचंद्र झिंगे व अन्य ९ यांनी १ डिसेंबर २०२५ रोजी नोंदणी कृत दस्त क्रमांक ९०००/२०२५ अन्वये सदरहू जमीन सुनीलकुमार सोनी यांना विकली आहे. समझोता करार करण्यात आलेला असून देखील दुसऱ्याला परस्पर जमीन विकणे हा धादांत फसवणुकीचा गुन्हा आहे. त्यानुसार एकच जमीन दोघांना विक्री केल्याचे निष्पन्न होते.दिनेश राम उर्फ रामचंद्र झिंगे व अन्य ९ यांनी अरिहंत सुपरस्ट्रक्चर्स तसेच सुनीलकुमार सोनी यांची एकाच वेळेस फसवणूक केलेली आहे. अरिहंत सुपरस्ट्रक्चर्स चे संचालक अशोक छाजेड यांच्यातर्फे विनोद दुबे यांनी खालापूर पोलीस स्थानकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना एका निवेदनाद्वारे तक्रार करून फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. रायगड जिल्ह्यात कर्जत तालुक्यामध्ये सगळ्यात जास्त जमीन खरेदी विक्रीची प्रकरणे सध्या पाहायला मिळतात. परंतु अशाप्रकारे सुप्रसिद्ध आणि प्रामाणिक म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या विकसकांना जर का टोपी लावण्याचे धंदे कुणी करत असेल तर त्यांना वेळीच चाप लावणे अत्यंत गरजेचे आहे.

या प्रकरणात चौकशी करून न्याय देण्याच्या प्रक्रियेला जर विलंब झाला तर त्याचा विपरीत परिणाम एकंदरीतच जमीन खरेदी विक्री करण्याच्या इंडस्ट्रीवर पडण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

# उत्सव हॉटेल' ला भीषण आग

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर)** : नवीन पनवेल सेक्टर 17 मधील पायल सोसायटी परिसरात असलेल्या उत्सव हॉटेलला अचानक भीषण आग लागली. आगीची माहिती मिळताच संजीवनी मित्र मंडळाचे समाजसेवक परेश घरत, रिपब्लिकन पार्टी (आठवले गट) पनवेल महापालिकेचे युवक अध्यक्ष अक्षय विकास अहिरे तसेच पंचशील नगर येथील जागरूक नागरिक तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्यात सहभागी झाले.घटनेनंतर नागरिकांनी त्वरेने अग्निशामक दलाशी संपर्क साधून मदतकार्य सुरू केले. हॉटेलमधील कर्मचारी तसेच पायल सोसायटीतील रहिवाशांना सुरक्षित स्थळी हलवून मोठ्या अनर्थापासून बचाव करण्यात आला. अग्निशामक दलाला आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी स्थानिक नागरिक व समाजसेवकांनी विशेष सहकार्य केले. तातडीने दाखवलेल्या सतर्कतेमुळे मोठी हानी टळली. घटनेनंतर परेश घरत व अक्षय




अहिरे यांनी प्रभागातील सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाची मागणी केली. त्यांनी म्हटले की प्रभागातील रेसिडेन्शियल ठिकाणी चालणारी कमर्शियल दुकाने व गोडाऊन तातडीने बंद करण्यात यावीत. कमर्शियल क्षेत्रात पूर्वीपासून चालू असलेल्या हॉटेल किंवा आस्थापनांकडे वैध फायर सेफ्टी परवानग्या आहेत का याची तपासणी तात्काळ करावी. अग्नितांडव टाळण्यासाठी आस्थापनांनी कोणत्या प्रकारच्या उपाययोजना केल्या आहेत याचा अहवाल मागवावा. दोन दिवसांत दोन ठिकाणी आग लागल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

यापुढे अशा घटना घडू नयेत यासाठी पनवेल महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांनी अधिक सतर्कता बाळगून, होण्याआधीच प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली.

# महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी केंद्र व राज्य सरकारच्या योजना प्रभावी – आमदार प्रशांत ठाकूर

## पनवेल विधानसभा मतदारसंघात उर्वरित लाभार्थ्यांना घरघंटी व शिलाई मशीनचे वाटप सुरु

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकाराने महिलांच्या स्वयंरोजगार उपक्रमाला सातत्य

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** सामान्य नागरिकांचे हित केंद्रस्थानी ठेवून कार्य करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी महिलांच्या सर्वांगीण विकास व सक्षमीकरणासाठी दूरदृष्टीपूर्ण, प्रभावी आणि समाजाभिमुख योजना अंमलात आणल्या आहेत. या योजनांमुळे महिलांना आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करण्याची नवी दिशा मिळत असून त्यांचा सामाजिक व आर्थिक स्तर अधिक भक्कम होत आहे, असे प्रतिपादन कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज (दि. १३) येथे केले.

पनवेल विधानसभा मतदारसंघातील महिलांना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकारातून राबविण्यात येत असलेल्या घरघंटी व शिलाई मशीन वाटप उपक्रमाचा पुढील टप्पा आजपासून सुरु झाला. काही दिवसांपूर्वी या योजनेचा शुभारंभ करण्यात आला होता. शहरी भागातील प्रभाग १४ ते २० मधील लाभार्थी महिलांना आज मशीनचे वाटप करण्यात आले. प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेअंतर्गत जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमांतर्गत एकूण ४,२५० पात्र महिलांची निवड करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात मोठ्या संख्येने महिलांना शिलाई मशीन व घरघंटीचे वाटप करण्यात आले होते. आजपासून शहरी भागातील लाभार्थी महिलांना मशीन व प्रमाणपत्रांचे वाटप करून हा उपक्रम यशस्वीरीत्या पूर्णत्वास नेण्यात येत आहे. यावेळी आयोजित यंत्रसामुग्री भव्य कार्यक्रमात ते प्रमुख मान्यवर म्हणून बोलत



होते. महिला सक्षमीकरणाच्या दृष्टिकोनातून या कार्यक्रमात उपस्थित सर्वांना 'बालविवाह विरोधात' शपथ देण्यात आली.

मार्केट यार्ड येथे झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी महापौर कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, सीता पाटील, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, माजी शहर अध्यक्ष अनिल भगत, पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, नवीन पनवेल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, माजी उपनगराध्यक्ष गणेश पाटील, माजी नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे, एकनाथ गायकवाड, प्रभाकर बहिरा, रघुनाथ बहिरा, मुकीत काझी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, सुशीला घरत, डॉ. सुरेखा मोहोकर, वृषाली वाघमारे, राजेश्री वावेकर, वर्षा नाईक, नीता माळी, रेणुका मोहोकर, कामगार आघाडीचे प्रदेश सचिव संजय भगत, रुपेश नागवेकर, उमेश इनामदार, केदार भगत, प्रीतम म्हात्रे, संयोजक संतोष पवार, ॲड. चेतन जाधव, युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष हिमेश बहिरा, सपना पाटील, भीमराव पोवार यांच्यासह हजारोच्या संख्येने लाभार्थी उपस्थित होत्या.

**दिबांचेच नाव विमानतळाला असणार - आमदार प्रशांत ठाकूर**

आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात पुढे बोलताना सांगितले कि, सर्वसामान्यांच्या हिताचा केंद्रबिंदू ठेवून कार्य करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी दूरदृष्टीपूर्ण व परिणामकारक योजना राबविल्या आहेत. महिलांना केवळ लाभार्थी न ठेवता त्यांना सक्षम उद्योजक, आत्मनिर्भर व्यक्ती आणि कुटुंबाच्या आर्थिक प्रगतीचा कणा बनविण्याचा या योजनांचा उद्देश आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येक भगिनीने शासनाच्या विविध योजनांचा योग्य लाभ घेत स्वतःमधील कौशल्यांचा विकास करावा, नवे तंत्र आत्मसात करून स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात आणि कुटुंबाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी पुढाकार घ्यावा. महिलांनी आत्मविश्वासाने पुढे येत आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारल्यास केवळ कुटुंबच नव्हे, तर समाज आणि राष्ट्राचीही प्रगती अधिक वेगाने साध्य होणार असून पंतप्रधान नरेंद्र मोदी मुख्यमंत्री फडणवीस यांचे आभार मानतो कि त्यांनी हि खनिकर्म योजना आणली आणि त्या माध्यमातून आम्हाला या सर्व बहिणींना योजनेचा लाभ देता आला. २०१४ सालच्या आधी पण योजना होत्या मात्र त्या प्रत्यक्ष



लाभार्थीपर्यंत पोहोचत नव्हत्या. मोदीजी पंतप्रधान झाल्यानंतर सर्व स्तरांसाठी योजना अंमलात आल्या आणि त्या प्रभावी व यशस्वीपणे राबविल्या जात आहेत. कोविडचे संकट आला होता त्यावेळी मोदींजींनी देशातील प्रत्येक माणसाचा विचार केला. तर राज्यात तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने कोणताच दिलासा नाही उलट कल्याणकारी प्रकल्पांना स्थगिती दिली. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार आल्यानंतर योजनांना बळ मिळाले. त्याचबरीबरीने लाडकी बहीण योजना आणून बहिणींना लखपती बनविण्याचे प्रयत्न सुरु केले. आता या योजनेवर विरोधक टपून बसले आहेत आणि हि योजना बंद करण्यासाठी वाट पहात असा टोलाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी विरोधकांना लगावला. विमानतळाच्या नामकरणासंदर्भात बोलताना, भाजपचे सरकार आले आणि लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावाचा ठराव झाला. मात्र दिबांच्या नावाला तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने विरोध केला होता.

दिबांच्या नावासाठी आम्ही लढा उभारला आमच्यावर विमानतळ नामकरणाच्या पाच पाच फौजदारी गुन्हे आहेत त्यामुळे विरोधकांनी गमजा मारू नयेत असा सल्लाही त्यांनी दिला. पुणे येथील विमानतळाला जगतगुरु संत तुकाराम, संभाजी नगर विमानतळाला छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव देण्यात येणार तेथेही तांत्रिक प्रकियेमुळे उशीर होत असून दिबांचेच नाव विमानतळाला असणार आहे असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणातून अधोरेखित केले.

**लाडक्या प्रशांतदादांच्या पुढाकाराने सर्व समाजासाठी सातत्यपूर्ण लोककल्याणकारी कार्य - जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी**

यावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी आपल्या भाषणात सांगितले कि, पनवेल विधानसभा मतदारसंघात सर्व समाजघटकांच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार प्रशांत ठाकूर हे सातत्याने तळमळीने कार्यरत असून, सामान्य नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी विविध लोककल्याणकारी योजना प्रभावीपणे राबवत आहेत. महिलांचे सक्षमीकरण, युवकांना रोजगाराच्या संधी, सामाजिक घटकांना आधार देणाऱ्या योजना अशा अनेक उपक्रमांमुळे आमदार प्रशांत ठाकूर यांची नाळ सर्वसामान्य जनतेशी घट्ट जोडली गेली आहे. सर्व समाजासाठी समानतेने काम करणारे नेतृत्व म्हणून 'दादा' अशी ओळख निर्माण केलेले आमदार प्रशांत ठाकूर हे मोठ्या मनाचे व संवेदनशील नेतृत्व मानले जाते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या योजनांमुळे अनेक कुटुंबांना दिलासा मिळाला असून, स्वयंरोजगार, शिक्षण, आरोग्य व सामाजिक विकासाच्या दिशेने मतदारसंघात सकारात्मक बदल घडला आहे. यापुढील काळातही या तसेच इतर नव्या लोकहितकारी योजना आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून सुरू राहतील, असा विश्वास अविनाश कोळी यांनी व्यक्त करत सर्वसामान्यांच्या समस्या समजून घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करणाऱ्या या नेतृत्वाबद्दल देण्यात येणारे आभार अपुरेच आहेत असे नमूद केले. सामाजिक बांधिलकी जपत, सर्व समाजघटकांना सोबत घेऊन विकासाचा मार्ग अवलंबणारे आमदार प्रशांत ठाकूर यांचे कार्य पनवेल विधानसभा मतदारसंघासाठी दिशादर्शक ठरत आहे.

त्यामुळे ते सर्वांचे लाडके प्रशांतदादा असून भगिनी लाडक्या प्रशांतदादांना धन्यवाद देत आहेत.


यावेळी महापौर कविता चौतमोल यांचेही भाषण झाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नवीन पनवेल मंडल अध्यक्ष दशरथ म्हात्रे तर आभार प्रदर्शन पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंझारराव यांनी केले.



**ग्रामीण भाग आणि त्यानंतर आज शहरी भागातील लाभार्थींना वाटप सुरु झाले त्यापुढील टप्प्यात कळंबोली, कामोठे व खारघर येथील लाभार्थींना यंत्रसामुग्रीचे वाटप होणार आहे. या उपक्रमामुळे पनवेल मतदारसंघातील अनेक महिलांना घरगुती उद्योग सुरू करण्याची संधी मिळाली असून शिलाई, पीठ गिरणी, तसेच इतर पूरक व्यवसायांद्वारे महिलांना स्थिर उत्पन्नाचा मार्ग उपलब्ध झाला आहे. स्वयंरोजगाराच्या माध्यमातून महिलांनी कुटुंबाच्या आर्थिक उन्नतीस हातभार लावावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी यापूर्वी स्पष्ट केले होते. महिलांनी मिळालेल्या यंत्रसामग्रीचा योग्य व सातत्यपूर्ण वापर करून आपला व्यवसाय वृद्धिंगत करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. शासन स्तरावर यंत्रसामग्रीच्या वापराचे सर्वेक्षण करण्यात येणार असून, स्वयंरोजगारात विशेष प्रगती करणाऱ्या महिलांना प्रोत्साहन देण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.या योजनेमुळे पनवेल विधानसभा मतदारसंघातील महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले असून, भविष्यात उपलब्ध निधीनुसार या उपक्रमाचा पुढील टप्पाही राबविण्यात येणार आहे. उर्वरित लाभार्थ्यांना आज वाटप पूर्ण झाल्याने महिलांकडून समाधान व्यक्त करण्यात येत असून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या या उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात येत आहे.**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय ध्येय, रिपब्लिकन पार्टी, आणि अधुरे राहिलेले स्वप्न



**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/विदर्भ प्रमुख :** "भारतीय रिपब्लिकन पक्षाचा सूर्यास्त होऊ देऊ नका; पुढे या, एकत्र या"— हा संदेश डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या सहकाऱ्यांना नेहमीच दिला. समाजात रक्ताचा एक थेंबही न सांडता परिवर्तन घडावे, ही त्यांची स्पष्ट भूमिका होती. समाजशुद्धी, राजकीय सबलीकरण आणि शासनकर्त्या समाजाची निर्मिती—हे त्यांचे अंतिम ध्येय होते. म्हणूनच त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना सांगितले होते ,"जा, आणि आपल्या घराच्या दारावर लिहून ठेवा—आपल्याला शासनकर्ती जमात बनायचे आहे."

**कर्तृत्ववान नेत्यांची फळी निर्माण करण्याचा प्रयत्न**

देशभरातील विविध प्रांतांतून त्यांनी सक्षम नेते घडवले—मद्रास प्रांतातून एन. शिवराज, उत्तर प्रदेशातून बी. पी. मौर्य, पंजाबातून एल. आर. बाली, मुंबई विभागातून बी. सी. कांबळे व आर. डी. भंडारे, विदर्भातून बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे व हरीदास बाबू आवळे, नाशिकचे दादासाहेब गायकवाड, कु. शांताबाई दाणी, बी. टी. बोराळे, प. जी. पवार, आर. आर. भोळे, डी. जी. जाधव, मान. बावचंद्र आंबेडकर, यशवंतराव आंबेडकर आणि अनेक समर्पित कार्यकर्ते.यातील काही कच्ची मडकी, तर काही पक्की मडकी ठरली—हे वास्तव बाबासाहेबांनी स्वतः मान्य केले होते.

**मोठया नेत्यांशी संघर्ष**

बाबासाहेबांचे जीवन संघर्षमय होते. मोहनदास गांधी, जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल, मालवीय, श्यामाप्रसाद मुखर्जी—या मोठ्या नेत्यांशी त्यांनी विचारांच्या पातळीवर आयुष्यभर संघर्ष केला. परंतु हा संघर्ष जातीय अभिमान किंवा वैयक्तिक द्वेषाचा नव्हता—तो होता मानवी हक्क, सामाजिक न्याय आणि राजकीय समानतेसाठी. दलित, शोषित, पीडित घटकांना हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी ब्रिटिश सरकारपुढे ठामपणे मांडणी केली आणि अनेक अधिकार प्राप्त केले.

**पुणे करार : वेदनादायी प्रसंग**

स्वतंत्र मतदारसंघ ही बाबासाहेबांची ऐतिहासिक मागणी. परंतु गांधीजींच्या आमरण उपोषणामुळे ती मागणी मागे घ्यावी लागली.

बाबासाहेबांनी स्पष्ट म्हटले होते—"मला या विद्युत खांबाला लटकवून फाशी दिली तरी चालेल; पण मी दबावाखाली सही करणार नाही." परंतु त्यांच्या लाखो जनतेवर होणाऱ्या परिणामाचा विचार करून त्यांनी जड हृदयाने पुणे करारावर सही केली. नंतर त्यांनी वेदनांनी म्हटले—"ही माझ्या जीवनातील सर्वांत मोठी चूक आहे; माझ्या समाजाची अपरिमित हानी झाली."

**स्वतंत्र मजूर पक्ष, शेड्युल्ड कास्ट फेडरेशन आणि रिपब्लिकन पार्टीचे स्वप्न**

1936 मध्ये त्यांनी स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला. त्यानंतर शेड्युल्ड कास्ट फेडरेशन उभारला आणि मुंबई विधानसभेत अनेक आमदार निवडून आणले. देशात पर्यायी, सर्वसमावेशक, प्रगल्भ पक्षाची गरज ओळखून त्यांनी "रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया" या नावाचा राष्ट्रीय पक्ष निर्माण करण्याचे ठरविले. हा पक्ष कोणत्याही एकाच जातिचा नसून सर्व समाजघटकांचा असावा—ही त्यांची भूमिका होती. त्यासाठी त्यांनी एस. एम. जोशी, राममनोहर लोहिया, मधू लिमये, आचार्य अत्रे यांच्यासह पत्रव्यवहार करून पक्षाचे बाय-लॉज तयार केले. त्यात त्यांनी पाच मुद्दे स्पष्ट केले ,एक नेता , एक झेंडा, एक चिन्ह,एक विचारधारा, राष्ट्रीय दर्जा. पण नियतीला ते मान्य नव्हते…

**महापरिनिर्वाण आणि त्यानंतरचे विघटन**

६ डिसेंबर १९५६—बाबासाहेबांचे महापरिनिर्वाण झाले त्यामुळे देशभर शोककळा पसरली. 1957 ला नेत्यांनी रिपब्लिकन पार्टीची औपचारिक स्थापना केली; अध्यक्ष झाले एन. शिवराज. परंतु काही वर्षांतच पक्षात मतभेद, अहंकार, गटबाजी वाढली. पार्टी विभागल्या गेली, खोरीप, भारीप, पँथर, पुढे डझनभर गट. बाबासाहेबांचे "एक नेता, एक झेंडा, एक पक्ष" हे स्वप्न तुटत गेले. नेत्यांचा अहंकार, आणि समाजाचा भ्रमनिरास. आजही प्रत्येक जण छोटा गट, छोटा पक्ष काढतो. बाबासाहेबांनी सांगितले होते— तरीही नेते अहंकार, स्वार्थ, दंभ सोडायला तयार होत नाहीत. निवडणुका आल्या की त्यांच्यात उत्साह संचारतो ,नेते निवडणूका लढवितात , मात्र गटबाजीच्या राजकारणामुळे कुणीही निवडून येत नाहीत; स्वतःही हरतात, सहकाऱ्यांनाही हरवतात,याचा फायदा इतरांना होतो मात्र यात समाजाचे नुकसान होते—नेत्यांचे नव्हे.

**बौद्ध संघाचा आदर्श आणि आजची आवश्यक**

दुसरी-तिसरी धम्मसंगतीच्या काळात भिक्खू संघ 18 गटांत विभागला होता. भंते मोगलीपुत्त तिस्स यांनी सर्वांना एकत्र आणून एकसंध संघ केला. हा आदर्श आज रिपब्लिकन नेतृत्वासाठी अत्यंत आवश्यक आहे.

धम्म—राजकारण वेगळे असले तरी धर्माला राजाश्रय मिळाला तर तो हतगतीने पसरतो—याचा इतिहास पुरावा आहे.

आजची गरज आहे कि रिपब्लिकन चळवळ एकसंघ होणे . वंचित बहुजन आघाडी, बहुजन समाज पार्टी व समाजातील इतर सर्व पार्टी एकत्रित येऊन निवडणुका लढवल्या तर मोठा पर्याय उभा राहू शकतो. बहेन मायावती यांनी शासनात सामाजिक-आर्थिक परिवर्तन केले आहे. त्यांचा अजेंडा आणि रिपब्लिकन परंपरा एकमेकांशी सुसंगत आहेत.

आंबेडकरी जनतेसाठी आवाहन

बाबासाहेबांनी धम्म प्रसाराचा अधिकार प्रत्येक व्यक्तीला दिला आहे. म्हणून आज जनतेने—धम्मप्रचार, शिक्षण, आरोग्य, उद्योग-व्यवसाय या क्षेत्रांत काम करणे अत्यावश्यक आहे. बाबासाहेबांचे स्वप्न केवळ राजकारणात नव्हते; ते होते—शासक बनण्याचे, स्वाभिमानी समाज निर्माण करण्याचे. अंतिमत: एकच सांगावेसे वाटते , "रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचा सूर्यास्त होऊ देऊ नका.

बाबासाहेबांच्या नावावर राजकारण करू नका—कार्य करा. त्यांचे मिशन एकसंधपणे पुढे न्या."

**— प्राचार्य के. आर. हुमणे**
**वासुदेव नगर, नागपूर**